सोलापूर
Solapur Tarun Bharat
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | रविवार, २० ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २०७ | पाने : ८+८ आसमंतसह | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com




# ढगफुटीच्या पावसात निमखेडी बस स्थानकाचा स्लॅब कोसळला

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ ऑक्टोबर

भरपावसात निमखेडी बस स्थानकाचा स्लॅब कोसळल्याची घटना शुक्रवारी रात्री घडली दरम्यान रात्रीच्यावेळ असल्याने कोणताही अनर्थ घडला नाही



सोयगाव-बनोटी रस्त्यावर असलेल्या निमखेडी फाट्यावर बस स्थानकाचा भरपावसात स्लॅब कोसळून बस स्थानक धोकादायक झाले आहे त्यामुळे शनिवारी पहाटेपासून प्रवाशांची गैरसोय झाली होती दरम्यान रात्रीची वेळ असल्याने कोणताही अनर्थ घडला नसल्याचे प्रशासन कडून स्पष्ट करण्यात आले आहे सोयगाव परिसरात शुक्रवारी रात्री अतिवृष्टी चा मुसळधार पाऊस झाला दरम्यान या वादळीपावसाने निमखेडी बस स्थानकचा स्लॅब कोसळला आहे शनिवारी महसूल कडून घटनेचा पंचनामा करून संबंधित विभागाला अहवाल पाठविण्यात आला आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी मॅडम, सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर कन्नड यांचे न्यायालयात**

दि. किरकोळ अर्ज क्र. १२४/२०२४

अर्जदार १- देवचंद लालचंद राठोड, वय ३८ वर्षे, धंदा- शेती, रा. सितानाईक तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद २- प्राची देवचंद राठोड. वय- १३ वर्षे, धंदा शिक्षण, अ.पा.क अर्जदार क्र. १ वडील. ३- श्रावणी देवचंद राठोड, वय- ०८ वर्षे, धंदा- शिक्षण, अ.पा.क अर्जदार क्र. १ वडील,

विरुद्ध

गैर अर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे - जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे विधीज्ञ पी. एस. जाधव यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे मौजे सितानाईक तांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद येथील कायमचे रहिवाशी असुन अर्जदार क्र. २ व ३ या अर्जदार क्र. १ च्या मुली आहे. अर्जदार क्र. १ यांच्या पत्नी व अर्जदार क्र. २ व ३ यांच्या आई नामे सविता देवचंद राठोड या होत्या त्यांचा दिनांक ०४/०६/२०२२ रोजी मौजे सितानाईक तांडा येथे अपघाती मृत्यु झाला आहे. सोबत मयताचे मृत्यु प्रमाणपत्राची प्रत दाखल करीत आहे. अर्जदार यांना सदरील वारस प्रमाणपत्र हे शासकिय, निमशासकीय कार्यालयात देण्यासाठी तसेच महसुल दप्तरी नोंद घेण्यासाठी तसेच मयताच्या नावे ड्ढख बैंक शाखा कन्नड येथे, तसेच जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा वडनेर येथे असलेले रक्कम वारसाच्या नावे मिळण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरील अर्ज दाखल करण्यास कारण घडले आहे, करीता अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र. १ ते ३ हे मयतास कायदेशीर वारस आहे. यांच्या व्यतीरीक्त मयतास इतर कुणीही वारस नाही.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक १९/१०/२०२४

आदेशावरुन

सहायक अधिक्षक कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १४८/२०२४

अर्जदारः १) बेबाबाई धर्मा चव्हाण, वय-७० वर्ष धंदा-घरकाम २) भास्कर धर्मा चव्हाण वय-४५ वर्ष धंदा- शेती ३) देविदास धर्मा चव्हाण, वय-४२ वर्ष धंदा- शेती १ ते ३ रा.धाप ता. सोयगाव जि. औरंगाबाद. ४) संगीता गोपीचंद वंजारी, वय-४०वर्ष धंदा-घरकाम रा. आनंदनगर, निपाने ता. एरंडोल, जि. जळगाव. ५) रामेश्वर धर्मा चव्हाण, वय-३८ वर्ष धंदा-शेती रा.धाप ता. सोयगाव जि. औरंगाबाद.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण: वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील कै. धर्मा हारसिंग चव्हाण यांचा दिनांक १०/०७/२०१८ रोजी वृद्धपकाळाणे मौजे धाप, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ५ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ५ हे मयत कै. धर्मा हारसिंग चव्हाण यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ५ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ५ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १८/११/२०२४. आज दि. १८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक, अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव.

## जाहीर प्रगटन

मे. कन्नड येथिल दिवाणी न्यायाधीश (मे.ए.आय. आवटी मॅडम) क.स्तर यांचे कोर्टात

पु.ता. २६/११/२९

दि. किरकोळ अर्ज क. २९८/२०२४

अर्जदार : १. जमुनाबाई भ्र त्र्यंबक चव्हाण वय-७६ धंदा- घरकाम २. सुखदेव पि. त्र्यंबक चव्हाण वय-६६ धंदा शेती ३. रामचंद्र पि. त्र्यंबक चव्हाण वय-४५ धंदा- शेती ४. नेमीचंद पि.त्रंबक चव्हाण वय-३२ धंदा- शेती ५. कविता भ्र.अमलक राठोड वय-४१ धंदा शेती सर्व रा. मु. भोपेवाडी पो. नागदतांडा ता. कन्नड जि. औरंगाबाद

-: विरूध्दः-

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन, तर्फे जिल्हाधिकारी साहेब, औरंगाबाद

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे तरतुदी प्रमाणे हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत

ज्याअर्थी वरील अर्जदार क. १ ते ५ यांनी या मा. न्यायालयात ॲड. महेंद्र जी. देशमुख कन्नड यांचेमार्फत अर्ज दाखल केला आहे की अर्जदार क. १ चे पती अर्जदार क. २ ते ४ यांचे वडील मयत नामे त्र्यंबक पि.सेवा चव्हाण यांचा मृत्यु दि. ०६/०२/२०२४ रोजी मौजे भोपेवाडी ता. कन्नड जि. औरंगाबाद येथे झाला आसून, मयतास केवळ अर्जदार क. १ ते ५ हेच त्यांचे एकमेव कायदेशिर वारसदार असून अर्जदारांव्यतीरिक्त मयतास इतर कोणीही वारस नाही. मयत त्र्यंबक पि. सेवा चव्हाण यांचे नांवे आसलेल्या स्थावर व जंगम मिळकतीबाबत नमुद अर्जदार यांना वारस कारवाई करणेसाठी तसेच इतर शासकीय, निमशासकीय तसेच निरनिराळ्या सरकारी योजनेंचा लाभ घेण्यासाठी व वारस कारवाई करण्यासाठी अर्जदार क. १ ते ५ हेच मयताचे कायदेशीर वारस असल्याचे हेअरशिप सर्टीफिकेट मिळावे म्हणून या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदरहु जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार क. १ ते ५ हे मयत त्र्यंबक पि. सेवा चव्हाण यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत तसेच मयताचे वारस अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय, तसेच स्थावर व जंगम मिळकतीचे रेकॉर्डला वारस कारवाई करण्यासाठी वारस प्रमाणपत्र / हेअरशिप सर्टिफिकेटची आवश्यकता आहे. अर्जदारांच्या मागणीनुसार त्याच्या हक्कात त्यांना वारस प्रमाणपत्र देण्याबाबत आदेश पारीत करण्यास ज्या कुणाचा कसलाही उजर, आक्षेप, हरकत असेल तर त्यांनी प्रस्तुतचे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेच्या तारखेपासुन ३० दिवसाचे आत या न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप, हरकत न आल्यास अर्जदारास वारस प्रमाणपत्र देण्याबाबतचे आदेश गैरअर्जदारास देण्यात येईल व मुदतीनंतरचा उजर, आक्षेप ग्ग्रहय धरला जाणार नाही.

करीता आज दि. १९/१०/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिले आहे .

आदेशावरून

क. लिपिक — सहायक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय के स्तर कन्नड)

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १०४ /२०२४

अर्जदारः-१) पोंगुबाई विश्राम चव्हाण, वय-७५ वर्ष धंदा-घरकाम रा.धाप ता. सोयगाव जि. औरंगाबाद २) सुमनबाई अरुण राठोड वय-५७वर्ष धंदा-घरकाम रा. विष्णूनगर, पोस्ट-गाळण, ता. पाचोरा, जि. जळगाव. ३) संतोष विश्राम चव्हाण, वय-५० वर्ष धंदा- शेती रा.धाप ता.सोयगाव जि. औरंगाबाद ४) संगीताबाई सुरेश वंजारी, वय-४३वर्ष धंदा- शेती रा.लाख तांडा, ता.पाचोरा जि.जळगाव. ५) कविताबाई गोकुळ राठोड वय-३८वर्ष धंदा- शेती रा. कोकडीतांडा, आंबेवडगाव, ता.पाचोरा, जि. जळगाव. ६) सविताबाई नारायण पवार वय-३६वर्ष धंदा- शेती रा. एन-६, सिडको, छ. संभाजीनगर. ७) विनोद विश्राम चव्हाण, वय-३२वर्ष धंदा- शेती रा.धाप ता. सोयगाव जि. औरंगाबाद.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ७ यांचे वडील कै. विश्राम लालचंद चव्हाण दिनांक ०९/०४/२०२३ रोजी वृद्धपकाळाणे मौजे धाप, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ७ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ७ हे मयत कै. विश्राम लालचंद चव्हाण यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ७ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार क्र. १ ते ७ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २५/१०/२०२४. आज दि. १८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क- स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. ९३/२०२४

अर्जदारः-१) सुंदराबाई तुळशीराम शेकरे वय-६० वर्ष धंदा-घरकाम २) शांताराम तुळशीराम शेकरे वय-३८ वर्ष धंदा-शेती ३) तुकाराम तुळशीराम शेकरे वय-३४वर्ष, धंदा-शेती ४) आत्माराम तुळशीराम शेकरे वय-३३वर्ष, धंदा-शेती १ ते ४ रा. वडगाव (तिग्ज़ी), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व सबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील कै. तुळशीराम आनंदा शेकरे यांचा दिनांक-२५/१०/२०२२ रोजी वृद्धपकाळाणे मौजे वडगाव (तिग्जी), ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे मयत कै. तुळशीराम आनंदा शेकरे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

पुढील तारीख ५/११/२०२४. आज दि.१८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती. एस.एस. अग्रवाल, दिवाणी न्यायाधिश, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं. ४६०/२०२४

प्रकरणात पुढील तारीख २५/११/२०२४

अर्जदार -१) जमिला अब्दुलरऊफ शेख वय ५३ वर्षे, धंदा घरकाम रा. एक खाना मस्जिद जवळ, फकीर गल्ली, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) अब्दुल रहीम पिता अब्दुल रऊफ शेख वय ३७ वर्षे, धंदा मजूरी रा. एक खाना मस्जिद जवळ, फकीर गल्ली, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद मो. नं. ९९६०७९६५०५ ३) फौझिया भ्र. खलील शेख वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. गल्ली नं.८, क्रांती नगर, राबोदी नं.२, ठाणे (पश्चिम) ता. जि. ठाणे ४) नाझिया भ्र. जुबेर सय्यद वय ३३ वर्षे, धंदा घरकाम रा. दर्गा रोड, जामा मस्जिद जवळ, परदेसपुरा, गंगापूर, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ५) अब्दुलसमद पिता शेख अब्दुलरऊफ वय ३२ वर्षे, धंदा मजूरी रा. एक खाना मस्जिद जवळ, फकीर गल्ली, गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्रं. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रं. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे वडील नामे अब्दुलरऊफ अब्दुलरज्ज़ाक शेख हे दिनांक ०४/१२/२०२३ रोजी मौजे गंगापूर, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासू सासरे व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे आजी- आजोबा हे बऱ्याच वषापुर्वी मयत झालेले आहे. त्यामुळे मयत अब्दुलरऊफ अब्दुलरज्ज़ाक शेख यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. ३ व ४ ह्या मुली असून अर्जदार क्रं. २ व ५ हे मुले या नात्याने कायदेशीर वारसदार असून अर्जदार क्रं. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत अब्दुलरऊफ अब्दुलरज्ज़ाक शेख यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन. आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र. १०६/२०२४

अर्जदारः-१) कौशल्याबाई गबा सूर्यवंशी, वय-७० वर्ष धंदा-घरकाम २) विजय गत्वा सूर्यवंशी, वय-४७वर्ष धंदा- शेती ३) सुनिल गबा सूर्यवंशी वय-४३वर्ष धंदा-शेती ४) नाना गबा सूर्यवंशी वय-४०-वर्ष धंदा-शेती सर्व रा. किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता.सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र.२ ते ४ यांचे वडील, कै. गबा झेंडू सूर्यवंशी यांचा दिनांक-२०/०४/२०१६ रोजी वृद्धपकाळाणे मौजे किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ४ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ४ हे, कै. गबा झेंडू सूर्यवंशी यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ४ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ४ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख १८/११/२०२४. आज दि. १८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक, अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. ए. आय. आवटी दिवाणी न्यायाधिश साहेब कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयात.**

दि. किरकोळ, अर्ज.क्र. २२६/२०२४.

पुढील तारीख ११/११/२०२४.

अर्जदार : १. लताबाई भ्र. संभाजी गायकवाड, वय ५४ वर्षे, धंदा घरकाम, रा. शिवराई पो. बनशेंद्रा ता. कन्नड जि. औरंगाबाद. २. ताराबाई भ्र. पुंडलिक शिंदे, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. शेलगांव ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३. पोपटराव पिता रामदास बोर्डे, (मयत दि.१२/१०/२०२२ चे वारस) ३.१ काशीबाई भ्र. पोपटराव बोर्ड, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.२ राहूल पिता पोपटराव बोर्डे, वय २९ वर्षे, धंदा व्यापार, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.३ आकाश पिता पोपटराव बोर्डे, वय २६ वर्षे, धंदा व्यापार, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद. ३.४ अनिकेत पिता पोपटराव बोर्डे, वय २२ वर्षे, धंदा शिक्षण, रा. वडनेर तांडा, ता. कन्नड जि. औरंगाबाद.

विरुद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन द्वारा जिल्हाधिकारी कार्यालय, छ. संभाजीनगर.

अर्ज :- बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ कलम २ व ३ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार यांनी त्यांचे वकील ॲड.डी.एन. चव्हाण यांचे मार्फत या न्यायलयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ व २ हे मयत रामदास एकनाथ बोर्डे व मयत सुमनबाई रामदास बोर्डे यांच्या विवाहित मुली आहेत व अर्जदार क्र. ३ मयत पोपटराव रामदास बोर्डे हा मुलगा होता. मयत रामदास एकनाथ बोर्ड व मयत सुमनबाई रामदास बोर्ड यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस आहे. मयत रामदास एकनाथ बोर्डे हे दिनांक २४/१०/२००५ रोजी मौजे वडनेर ता. कन्नड येथे आजारापणामुळे मरण पावले असून व मयताची पत्नी सुमनाबाई भ्र. रामदास बोर्डे ह्या दि.०२/१०/२०१४ रोजी मौजे वडनेर, ता. कन्नड येथे मयत झालेली आहे. मयत रामदास एकनाथ बोर्डे व मयत सुमनबाई रामदास बोर्डे यांना अर्जदार क्र. १ ते ३ अशी एकूण ३ आपत्या होती. त्यापैकी अर्जदार क्र. ३ पोपटराव हा मयत असून त्यांचे ईतर आपत्य हे हयात आहे. मयतांचा मुलगा पोपटराव रामदास बोर्डे हा दि. १२/१०/२०२२ रोजी मौजे वडनेर ता. कन्नड येथे मयत झाला आहे. त्यास अर्जदार क्र. ३.१ ही पत्नी असून अर्जदार क्र. ३.२ ते ३.४ हे मुले असून या व्यतिरिक्त मयत पोपटराव रामदास बोर्डे यांना इतर कोणीही वारस नाही. अर्जदार क्रं. १ ते ३ यांना मयत रामदास एकनाथ बोर्डे व मयत सुमनबाई रामदास बोर्डे यांचे मृत्यू पश्चात तहसिल कार्यालय, नगर पालिका कार्यालय, ग्रामपंचायत कार्यालय, उपअधिक्षक भूमि अभिलेख कार्यालय, गाव, नगर व शहर भूमापन कार्यालय, महानगर पालिका, तलाठी कार्यालय, महसूल दप्तरी, गट विकास अधिकारी कार्यालय व इतर शासकिय व निमशासकिय कार्यालय मध्ये आवश्यक ते कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार नं. १ ते ३ हे मयताचे वारस असल्याबाबत कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. अर्जदार क्रं. १ ते ३ हे व त्यांचे मयत वडील नामे रामदास एकनाथ बोर्ड व आई सुमनबाई भ्र. रामदास बोर्डे हे मौजे वडनेर तांडा येथे राहत असतांना आजारपणामुळे मयत झाले आहे. सदरील मयतास अर्जदार क्रं. १ ते ३ हे वारस असून वेळोवेळी वेगवेगळ्या कार्यालयात वारस प्रमाणपत्राची आवश्यकता भासत असल्यामुळे सदरील अर्जास कारण दि.०२/०९/२०२४ रोजी मौजे वडनेर ता. कन्नड येथे घडले, अर्जदारांनी यापुर्वी अशा प्रकारचा वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठीचा अर्ज इतर कोणत्याही न्यायालयात दाखल केलेला नाही अथवा न्याय प्रविष्ठ नाही. त्याअर्थी सादर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, अर्जदार यांनी अर्ज केल्यानुसार वारसा प्रमाणपत्रासाठी परवानगी देण्याबाबत ज्या कुणास, कुठल्याही स्वरुपाचा उजर आक्षेप वगैरे असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस (३०) दिवसांच्या आत आपला उजर, आक्षेप वगैरे मा. न्यायलयात नोंदवावा. मुदतीत उजर आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यात येईल. त्यानंतर आलेला उजरआक्षेप ग्राह्य धरला जाणार नाही, याची नोंद घ्यावी

दिनांक :- १६/१०/२०२४.

आदेशावरून

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, कन्नड.

## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एस. वाय. वाकचौरे, ३ रे सह दिवाणी न्यायाधिश साहेब, (क.स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्रं.४५९/२०२४

प्रकरणात पुढील तारीख ०३/१२/२०२४

अर्जदार -१) नानासाहेब पिता गमनराव राहिंज वय ५५ वर्षे, धंदा नोकरी रा. फ्लॅट नं. बी/५, प्लॉट नं. ६८,६९, सर्व्हे नं.-६८, संत तुकोबा नगर, एन-२, सिडको, योगराज रेसीडेन्सी, औरंगाबाद मो. नं. ७७९६५५८३४५ २) वसंत पिता गमनराव राहिंज वय ४५ वर्षे, धंदा मजूरी रा. भानवाडी, हरसूल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद. ३) ताराचंद पिता गमनराव राहिंज वय ४२ वर्षे, धंदा मजूरी रा. मु. भानवाडी, पो. लासूर स्टेशन, हरसूल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद

४) कल्पना भ्र. गोरख गोत्रे वय ४४ वर्षे, धंदा घरकाम रा. गोत्रे मळा, धुळे रोड, चाळीसगांव, जि. जळगांव

विरूध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

सर्व जनतेस कळविण्यात येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ४ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्र. १ ते ३ हे आपसात सख्खे भाऊ असून अर्जदार क्रं. ४ ही अर्जदार क्र. १ ते ३ यांची विवाहीत बहिण आहे. अर्जदार क्र. १ ते ४ यांचे वडील नामे गमनराव शंकरराव राहिंज हे दिनांक १९/०९/२०२३ रोजी व अर्जदार क्रं. १ ते ४ यांची आई नामे गयाबाई गमनराव राहिंज या दिनांक ०२/०९/२०२२ रोजी मौजे भानवाडी, हर्सल, लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असून मयतांना अर्जदार क्रं. १ ते ३ हे मुले व अर्जदार क्रं. ४ ही मुलगी या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतांना अर्जदार क्रं. १ ते ४ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत गमनराव शंकरराव राहिंज व मयत गयाबाई गमनराव राहिंज यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. करीता जाहीर प्रगटन.

आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरून

लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी-१/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-५५८

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड

दिनांक २४/०९/२०२४

अर्जदार : ताराचंद परभत आडे रा. भारंबा तांडा ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय भारंबा तांडा ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय : जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलाच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०९-०८-२०१० रोजी भारंबा तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०९-०८-२०१० रोजी भारंबा तांडा ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगाचा जन्म दिनांक ०९-०८-२०१० रोजी भारंबा तांडा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक १३-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०९-०८-२०१० रोजी भारंबा तांडा येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २०./०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

## जाहीर प्रगटन

**उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड**

जा.क्र. २०२४/मशाका/जमाबंदी- १/जन्म-मृत्यु नोंद/सिआर-६७२

उपविभागीय अधिकारी कार्यालय कन्नड दिनांक २७/०९/२०२४

अर्जदार : समाधान धनराज राठोड राभिलदारी सायगव्हान ता. कन्नड जि.छ. संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : ग्रामपंचायत कार्यालय भिलदरी / सायगव्हान ता. कन्नड जि. छत्रपती संभाजीनगर

विषय :- जन्म-मृत्यु अधिनियम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज.

उपरोक्त विषयी अर्जदार यांनी अर्ज सादर करून अर्जदार यांच्या मुलगीच्या जन्म प्रमाणपत्र मिळविण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक ०४-०८-२०२३ रोजी भिलदरी / सायगव्हान ता. कन्नड येथे झालेला आहे.

अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक ०४-०८-२०२३ रोजी भिलदरी / सायगव्हान ता. कन्नड येथे झालेला आहे. अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय कामासाठी जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे तसा अर्ज अर्जदार यांनी मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

सदर जाहिर प्रगटनाव्दारे तमाम जनतेस सुचीत करण्यात येते की, अर्जदार यांच्या मुलगीचा जन्म दिनांक ०४-०८-२०२३ रोजी भिलदरी / सायगव्हान येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यास कोणास काही उजर/आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन ३० दिवसाच्या आत म्हनजेच प्रकरणाच्या पुढील सुनावणी दिनांक २७-११-२०२४ रोजी मा. न्यायालयात लेखी स्वरूपात आपला आक्षेप नोंदवावा. मुदतीत कोणचाही आक्षेप/उजर न आल्यास अर्जदारास दिनांक ०४-०८-२०२३ रोजी भिलदरी / सायगव्हान येथे जन्म झाल्याचे जन्म प्रमाणपत्र देण्यात येईल व मुदतीतनंतर आलेला उजर/आक्षेप ग्राहय धरला जाणार नाही.

करिता दिनांक २.७./०९/२०२४ रोजी सदर जाहिर प्रगटन माझ्या सहीनिशी व मा. न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे.

उपविभागीय अधिकारी कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद.**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १६५/२०२४.

अर्जदारः- १) अनिल विश्वनाथ चौधरी, वयः ४६ वर्षे, धंदाः शेती. २) प्रदीप उर्फ प्रदीपभाई विश्वनाथ चौधरी, वयः ४८ वर्षे, धंदाः शेती दोन्ही अर्जदार रा. जरंडी ता. सोयगांव जि. औरंगाबाद. ३) सौ. उज्वला सुरेश पाटील, वयः ५५ वर्षे, धंदाः घरकाम. ४) सौ. शैलाबाई भगवान पाटील, वयः ५२ वर्षे, धंदाः घरकाम. दोन्ही अर्जदार रा. पहान ता. पाचोरा जि. जळगांव. ५) सौ. मिनाबाई राजेंद्र महाजन, वयः ५० वर्षे, धंदाः घरकाम, रा. चिंचोली पिंप्री (फत्तेपुर) ता. जामनेर जि. जळगांव.

विरूध्द

गैरअर्जदारः- निरंक

अर्जः- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ॲड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद, यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे. मयत नामे विश्वनाथ आनंदा चौधरी, यांचा मृत्यु दिनांकः ०६/०६/२०२४ ला मौजे जरंडी येथे मयत झालेले असुन त्यांना वरील अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारास शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे.

(पुढील दिनांकः २९/११/२०२४).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांकः १७/१०/२०२४ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

विभागीय लिपीक. — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद.

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायधिश साहेब, क. स्तर न्यायालय वैजापूर जि. औरंगाबाद

दि.कि.अर्ज.क. ४५५/२०२४

अर्जदार : १) जाईबाई भ्र. वामन पादर, वय ७० वर्षे, धंदा. मजुरी, रा. लिंबेजळगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) जनाबाई भ्र. नारायण औताडे, वय. ४० वर्षे, धंदा. मजुरी, रा. देर्डा ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर ३) मुक्ता भ्र. नामदेव घोलप, वय. ४३ वर्षे, धंदा. मजुरी, रा. लिंबेजळगांव ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर

विरूध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशल ॲक्ट कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदारने या न्यायालयात त्यांच्या वारस प्रमाणपत्र मिळणेकामी त्यांचे विधीज्ञ ॲड. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत प्रस्तुतचा अर्ज सादर केला असुन वामन धोंडीराम पादर हे लिंबेजळगांव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. २३/०५/२०२१ रोजी मौजे लिंबेजळगांव ता. गंगापूर येथे मरण पावले असून त्यांच्या माघारी त्यांना अर्जदार क. १ ही पत्नी असून अर्जदार क. २ ते ३ हया विवाहीत मुली कायदेशीर वारस असून अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना ते मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत शासकीय निमशासकीय कार्यालयात आवश्कता असल्याने व तशी मागणी अर्जदारांना करण्यात आले आहे. त्याप्रमाणे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देणे कामी आदेश व्हावा.

त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जास व त्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असल्यास या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासुन ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्दीनंतरचा आलेला आक्षेप-उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदाराच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे योग्य ते कायदेशीर आदेश पारित करतील.

करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी दिले.

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक,

दिवाणी व फौजदारी न्यायालय, गंगापूर

सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | रविवार, २० ऑक्टोबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २०७ | पाने : ८+८ आसमंतसह | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## राष्ट्रवादी काँग्रेसच्या विधानसभा जाहिरनामा समिती अध्यक्षपदी दिलीप वळसे- पाटील

मुंबई दि. १९ ऑक्टोबर – विधानसभा निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसने जाहीरनामा समितीच्या अध्यक्षपदी सहकारमंत्री दिलीप वळसे-पाटील यांची तर आमदार शिवाजीराव गर्जे यांची निमंत्रक म्हणून निवड करण्यात आली आहे. या समितीमध्ये : कृषीमंत्री धनंजय मुंडे, मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ, महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे, मुंबई विभागीय अध्यक्ष समीर भुजबळ, अल्पसंख्याक सेलचे प्रदेशाध्यक्ष आमदार इद्रीस नायकवडी, राष्ट्रीय प्रवक्ते अविनाश आदिक, महिला प्रदेशाध्यक्षा रुपाली चाकणकर, प्रदेश प्रवक्त्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, प्रदेश उपाध्यक्ष नजीब मुल्ला, ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष कल्याण आखाडे, सामाजिक सेलचे प्रदेशाध्यक्ष सुनिल मगरे, प्रदेश प्रवक्ते आनंद परांजपे, माध्यम सल्लागार संजय मिस्कीन आदींचा समावेश आहे.

## आज विहीप तर्फे मंदिर स्वच्छता अभियान

छत्रपती संभाजीनगर –

विश्व हिंदू परिषद व मंदिर अर्चक पुरोहित आयामतर्फे आज रविवार दिनांक २० ऑक्टोबर रोजी सकाळी ७ ते ११ या वेळात संपूर्ण महाराष्ट्र आणि गोवा राज्यात मंदिरे, गुरुद्वारे जैन स्थानके बौद्ध विहार इत्यादी सर्व धार्मिक ठिकाणी गाभारा ते अंगण सेवा स्वच्छता अभियान राबवले जाणार आहे. सर्व नागरिक बंधू भगिनी संस्था संघटना यांनी यात सहभाग नोंदवावा असे आवाहन विश्व हिंदू परिषदेचे प्रांत मंत्री योगेश्वर जी गर्गे व मंदिर अर्चक पुरोहित आयामाचे प्रांत संपर्कप्रमुख राजीव जहागीरदार यांनी केले आहे.

## जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला मतदारसंघनिहाय तयारी आढावा

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ (जिमाका):- विधानसभा निवडणूक २०२४ चा कार्यक्रम घोषीत झाला असून येत्या मंगळवारी म्हणजेच दि.२२ ऑक्टोबर रोजी अधिसुचना प्रसिद्ध व्हावयाची आहे. त्यापूर्वी प्रत्येक विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यास्तरावर करावयाच्या पूर्वतयारीचा आढावा आज जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी घेतला. दूरदृष्यप्रणालीद्वारे आयोजित बैठकीस जिल्ह्यातील सर्व विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय निर्णय अधिकारी,सहा. निवडणूक निर्णय अधिकारी सहभागी झाले होते. जिल्हा मुख्यालयातून जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व उपजिल्हा निवडणूक अधिकारी देवेंद्र कटके सहभागी झाले होते.या बैठकीत विधानसभा क्षेत्रनिहाय निवडणूक निर्णय अधिकारी यांच्यास्तरावर नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी करावयाची व्यवस्था, छाननीची व्यवस्था, विविध कामांनुसार तयार करावयाच्या समित्या, त्यांच्या कामकाजाची व्यवस्था, मतदान केंद्रांची रचना, संचारदृष्ट्या छायाप्रदेशात असणारी मतदान केंद्रे, मतदान केंद्रांचा मार्ग नकाशा, वाहनांची मागणी, दिशादर्शक फलक, माध्यम संनियंत्रण व्यवस्था याबाबत आढावा घेण्यात आला.




## गुलमंडीवरील अडथळे मनपा करणार दूर; विशेष पथकाची स्थापना

# अन्यथा व्यापाऱ्यांसह पथविक्रेत्यांना बसेल ५ हजारांचा दंड

छत्रपती संभाजीनगर : शहरात विविध सण उत्सव मोठ्या आनंदात साजरे केले जातात त्यात रमजान असो की, दिवाळी गुलमंडी, पैठण गेट, औरंगपुरा या भागात मोठ्या प्रमाणात हातगाड्या लागतात. खरेदीसाठी शहरवासीयांचे झुंबड उडते, परिणामी गर्दीतून वाट काढत धक्के खात शॉपिंग करावी लागते. पार्किंगचाही मोठा प्रश्न याकाळात भेडसावतो. मात्र यंदाची दिवाळी विनाअडथळा गुलमंडीवर शॉपिंग करता येणार आहे., त्यासाठी मनपाने विशेष पथक नेमून दुकानाबाहेर येणारे व्यापारी, हातगाडी तसेच रस्त्यावर बसून विक्री करणाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारण्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे यंदाच्या दिवाळीत शहरवासियांना खरेदीचा आनंद घेत शॉपिंग करता येईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

शहर चारही बाजूंनी विस्तारले असले तरी

खरेदीसाठी गुलमंडीवर येणाऱ्यांची संख्या काही कमी झालेली नाही. औरंगपुरा ते गुलमंडी, पैठण गेट ते सिटी चौक, सिटी चौक ते शहागंज या भागात



हातगाड्या लागतात. दुकानाबाहेर तसेच रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी विक्रेते दुकाने थाटतात. त्यामुळे खरेदीसाठी शहरवासीयांना वाहने पार्किंग करण्यापासून धक्के खात गर्दीतून वाट काढत खरेदी करावी लागते. यावेळी वादाच्या घटनाही होतात. गुलमंडीतील बाजारपेठेतील व्यापाऱ्यांनाही मोठी अडचण होते. त्यामुळे नागरिक व व्यापाऱ्यांच्या सोयीसाठी रस्त्यावरील अनधिकृत हातगाडीवाले तसेच विक्रेत्यांना वेसण घालण्याचा निर्णय घेतला आहे. मनपाने १८ जणांचे विशेष पथकही कारवाईसाठी नेमले आहे.

### यांच्यावर कारवाई करणार

६६ अनेक दुकानदारांनी दुकानासमोरील ओटे विक्रेत्यांना भाड्याने दिलेले असल्याचे दिसून आले आहे. त्यावर अनधिकृत विक्रेते दुकान मांडून बसत असल्याने, वाहतूकीस अडथळा होतो. तसेच त्यांच्याबाजूला इतर विक्रेतेही दुकान थाटतात. अशा लोकांवर कारवाईसाठी विशेष पथक नेमण्यात आले असून, हे पथक परिसरात फिरून दंडात्मक कारवाई करेल. वाहतूक कोंडी फोडण्यासाठी व्यापारी, हातगाडीवाले, पथविक्रेते आदींनी सहकार्य करावे.

– संतोष वाहुळे, अतिरिक्त आयुक्त, मनपा

सामान जप्त करणार

अतिक्रमण विभागाचे प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त संतोष वाहुळे यांनी गुरुवारी पथकासह गुलमंडी व परिसरात फिरुन पाहणी केली. जवळपास सर्वच व्यापाऱ्यांनी दुकानाबाहेर रस्त्यापर्यंत ओटे बांधून अतिक्रमण केलेले असून, विक्रीसाठी सामान व साहित्य ठेवत असल्याचे दिसून आले. व्यापाऱ्यांनो, दुकानातच राहा, रस्त्यावर अडथळा ठरेल, अशारितीने वस्तू मांडू नका, अन्यथा ५ हजारांचा दंड लावण्यात येईल, असा इशारा अतिरिक्त आयुक्त वाहुळे यांनी यावेळी दिला. तसेच अनधिकृत हातगाडीवाले व रस्त्यावर बसलेल्यांनाही सामान जप्त करण्याचा इशारा दिला., अशी माहिती सूत्रांनी दिली.

## देवगिरी अभियांत्रिकी व व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालयात चार दिवसीय पीसीबी डिझाइनवर कार्यशाळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर : सध्याचे युग हे तंत्रज्ञानाचे युग असल्यामुळे परिपुर्ण ज्ञान संपादन करण्यासाठी ही कार्यशाळा घेण्यात येत आहे. देवगिरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या आय.ई.टी.ई. विद्यार्थी मंच यांनी पीसीबी डिझाइन कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेचे उदघाटन महाविद्यालयाचे प्रभारी संचालक डॉ. सुभाष लहाने आणि इलेक्टॉनिक्स ण्ड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरींग विभागाच्या विभागप्रमुख डॉ. आरती वाढेकर यांनी केले. यावेळी डॉ. राजेश औटी व प्राध्यापकांची उपस्थिती होती.

पीसीबी कार्यशाळा एक प्रशिक्षण सत्र आहे जे सहभागींना प्रिंटेड सर्किट बोर्ड (पीसीबी) आणि त्यांची डिझाइन, असेंब्ली, चाचणी आणि उत्पादनाबद्दल शिकवते. पीसीबी कार्यशाळा अनेक विषयांवर लक्ष केंद्रीत करु शकतात, ज्यात सामविष्ट आहे. पीसीबी डिझाइन सॉफ्टवअर स्थापित करणे, लेआऊट आणि साधनांची समज स्कीमॅटीक संपादकाच्या मूलभूत गोष्टी प्रकल्प संकलित करणे आणि तयार करणे. या कार्यशाळेत पीसीबी तयार करण्याची प्रक्रिया प्रा. कृष्णा इंगळे, प्रा. सुनंदा कापडे, प्रा. सचिन जगदाळे, रुतीका धुशींग, श्र्वेता जगताप यांनी मांडली.

कार्यशाळेच्या आयोजनाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आ. श्री. प्रकाशदादा सोळुंके, सचिव मा. आ. श्री. सतीश चव्हाण, उपाध्यक्ष श्री. शेख सलीम शेख अहमद, कोषाध्यक्ष श्री. किरण आवरगावकर, कार्यकारीणी सदस्य श्री. विश्वास येळीकर, श्री. प्रदीप चव्हाण, महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुभाष लहाने, ट्रेनिंग ण्ड प्लेंसमेंटचे डिन प्रा. संजय कल्याणकर, विभागप्रमुख डॉ. सत्यवान धोंडगे, डॉ. गजेंद्र गंधे, डॉ. सचिन बोरसे, डॉ. सुगंधा नांदेडकर, डॉ. शोएब शेख, डॉ. रुपेश रेब्बा, प्रा. अमरसिंह माळी, श्री. अच्युत भोसले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिनंदन केले. कार्यशाळा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी आय.ई.टी.ई. विद्यार्थी मंचच्या संयोजक प्रा. कोमल दांडगे यांनी मार्गदर्शन केले व अध्यक्ष सुर्यकांत कुलकर्णी आणि संपुर्ण टीमने परीश्रम घेतले.

## कै.बाबुरावजी काळे उर्फ आप्पासाहेब यांच्या ३९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त अभिवादन



तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ ऑक्टोबर

अजिंठा शिक्षण संस्थेचे संत ज्ञानेश्वर महाविद्यालय,शिव ज्योती शिक्षण प्रसारक मंडळाचे ज्ञानज्योती शिक्षणशास्त्र महाविद्यालय व कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूल,सोयगाव यांच्या संयुक्त विद्यमाने अजिंठा शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष,ज्येष्ठ स्वातंत्र्यसेनानी,माजी लोकसभा सदस्य, महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील जेष्ठ मंत्री,महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे माजी उपाध्यक्ष,मराठवाड्याच्या विकासाचे शिल्पकार आणि सोयगाव तालुक्याचे भूमिपुत्र कै. बाबुरावजी काळे यांच्या ३९ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त संत ज्ञानेश्वर महाविद्यालयाच्या कै.बाबुरावजी काळे सभागृहात व्याख्यानाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाची सुरुवात कै. आप्पासाहेब यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण व दीप प्रज्वलन करून करण्यात आली. याप्रसंगी कै.बाबुरावजी काळे उर्फ आप्पासाहेब यांच्या विचारांचे स्मरण करून उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिरीष पवार तसेच प्रमुख वक्ते डॉ. राजेश यादव,माजी प्राचार्य डॉ. अशोकराव नाईकवाडे,उपप्राचार्य डॉ.रावसाहेब बारोटे, कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ.उल्हास पाटील,कै.बाबुरावजी काळे मराठी स्कूलचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर एलीस, कार्यक्रम संयोजन समिती सदस्य डॉ.दिपक पारधे,डॉ. पांडुरंग डापके,पंकज साबळे शहरातील प्रतिष्ठित नागरिक चंद्रकांत काळे, श्रीकृष्ण पाटील,अजय नेरपगार,सह अनेक मान्यवर मंचावर उपस्थित होते. प्रा.दिपक लिंबे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले तर प्रा.एस.के. कानडे यांनी आभार मानले. या कार्यक्रम प्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षक,शिक्षकेत्तर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## हॉकर्स झोनसाठी बघावी लागणार डिसेंबर अखेरची वाट

### निवडणूक घेण्याचे आयुक्तांनी दिले आदेश

छत्रपती संभाजीनगर : गेल्या काही वर्षांपासून गाजत असलेला शहरातील हॉकर्स झोनचा प्रश्न आता सुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यासाठी पालिकेचे प्रशासक जी. श्रीकांत यांनी डिसेंबर अखेरपर्यंतची मुदत संबंधित समिती गठीत करण्यासाठी दिली आहे. समिती स्थापन करण्यासाठी निवडणूक घेण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत.

शहरात हॉकर्स झोनचा प्रश्न काही वर्षांपासून प्रलंबित आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी आतापर्यंत केवळ चर्चा आणि सर्वेक्षण झाले; पण प्रत्यक्ष काम मात्र जुजबी स्वरूपात झाले. ठराविक हॉकर्स झोन नसल्यामुळे शहरातील बहुतांश रस्त्यांच्या बाजूने हातगाड्यांचे जाळे निर्माण झाले आहे. त्यामुळे वाहतुकीचा खोळंबा होतो आणि नागरिकांना त्रास सहन करावा लागतो.

पथविक्रेत्याने फिरते राहावे

केंद्र सरकारने २०१४ साली पथविक्रेत्यांसाठी धोरण निश्चित केले, त्यात सरकारने जोपर्यंत हॉकर्स झोन निश्चित होत नाहीत तोपर्यंत पथविक्रेत्यांवर कारवाई करण्यात येऊ नये असे म्हटले आहे. पथविक्रेत्यांनी एकाच ठिकाणी उभे राहून व्यवसाय करू नये, असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे. पथविक्रेत्याने फिरते राहावे व व्यवसाय करावा अशी अपेक्षादेखील सरकारने व्यक्त केली आहे.

ती यादी तयार

हॉकर्स झोन निश्चित करण्यासाठी महापालिका प्रशासनाने शहरातील पथविक्रेत्यांचे सर्वेक्षण करून यादी तयार केली. ह यादी कामगार उपायुक्त कार्यालयाला सादर करण्यात आली. त्यानंतर सरकारने शासनाला पत्र पाठवून हॉकर्स झोन निश्चित करण्यासाठी हॉकर्स संघटनांची निवडणूक घेऊन शहर पथविक्रेता समिती स्थापन करण्याचे आदेश दिले; पण त्याकडे संबंधित विभागांनी दुर्लक्ष केले. परंतु आता प्रशासक जी. श्रीकांत यांनी या प्रकरणात लक्ष घातले आहे. पथविक्रेता समिती गठीत करण्यासाठी डिसेंबरपर्यंत निवडणूक घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे डिसेंबर अखेरपर्यंत ही समिती स्थापन होऊन हॉकर्स झोन निश्चित होतील असे मानले जात आहे

## सावधान! सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट, रील वायरल करताल

### कन्नड शहर पोलिसांनी केले आवाहन

कन्नड :- दि.१९ ऑक्टोबर – विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शहरात कायदा सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कन्नड शहर पोलिस सोशल मीडियावर करडी नजर ठेवून आहेत आदर्श आचार संहिता काळात सोशल मीडियाच्या माध्यमातून सोशल मीडियाद्वारे फेसबुक, इंस्टाग्राम, व्हाट्सअप ग्रुप व इतर तत्सम एप्लीकेशनच्या माध्यमाद्वारे कोणत्याही समाजाच्या,जातीच्या, धर्माच्या भावना दुखावतील अशा स्वरूपाच्या पोस्ट, कॉमेंट्स, स्टोरी, स्टेटस, डिजिटल बॅनर असे प्रकार वरील माध्यमाद्वारे करण्यात येऊ नये तसेच कोणाचेही विरोधात घोषणाबाजी करू नये, डीजेवर बंदी असून डीजे बंद राहणार आहे. यासोबतच व्हाट्सअप ग्रुपचे डमिन यांनी दि.१५ ऑक्टोबर ते २३ नोव्हेंबर या कालावधीमध्ये त्यांच्या ग्रुपच्या सेटिंग मध्ये पश्रू रवाळप करून बदल करून घ्यावा, जेणेकरून ग्रुप मधील कोणताही सदस्य वादग्रस्त पोस्ट ग्रुप वर टाकणार नाही जर ऍडमिन यांनी सेटिंग मध्ये बदल केला नाही व कोणी सदस्याने वादग्रस्त पोस्ट टाकल्याने काही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास पोस्ट करणाऱ्या सदस्यासह ग्रुप डमिन ला जबाबदार धरून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल अशी माहिती पोलिस निरीक्षक बाळासाहेब भापकर यांनी दिली आहे .

## बंधन निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्स फंड लाँच

पुणे : बंधन म्युच्युअल फंडने गुंतवणूकदारांसाठी बंधन निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंड आणि बंधन निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्स फंड लाँच करण्याची घोषणा केली आहे. या ओपन-एंडेड इंडेक्स स्कीम्स आहेत, ज्या अनुक्रमे निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स आणि निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्सला ट्रॅक करतात. निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स निफ्टी ५०० युनिव्हर्समधील ५० पेक्षा कमी मूल्य असलेल्या कंपन्यांवर लक्ष केंद्रित करतो, तर निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्स प्रबळ कामगिरीच्या आधारानुसार ५० शेअर्सवर लक्ष केंद्रित करतो.

न्यू फंड ऑफर्स (एनएफओ) गुंतवणूकीसाठी सोमवार १४ ऑक्टोबर २०२४ रोजी खुला होईल आणि गुरूवार २४ ऑक्टोबर २०२४ रोजी बंद होईल. बंधन निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंड आणि बंधन निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्स फंड या दोन्ही फंडांमध्ये परवानाधारक म्युच्युअल फंड वितरक, ऑनलाइन प्लॅटफॉर्मर्सच्या माध्यमातून किंवा त्यांच्या संबंधित लिंक वर गुंतवणूक करता येऊ शकते.

फॅक्टर-आधारित धोरणांच्या वाढत्या मागणीबाबत माहिती देत बंधन एएमसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल कपूर म्हणाले, ''फॅक्टर गुंतवणूक अत्यंत लोकप्रिय ठरली आहे, कारण ही गुंतवणूक ऐतिहासिकदृष्ट्या जोखीम किंवा परताव्यांना संचालित करणाऱ्या विशिष्ट वैशिष्ट्यांवर लक्ष केंद्रित करते. बंधन निफ्टी ५०० व्हॅल्यू ५० इंडेक्स फंडाचे त्यांच्या अंतर्गत मूल्यापेक्षा कमी मूल्यामध्ये व्यवहार करणाऱ्या शेअर्समध्ये गुंतवणूक करण्याचे आणि त्यांच्या संभाव्य रिकव्हरीमधून फायदा घेण्याचे लक्ष्य आहे. दरम्यान, बंधन निफ्टी ५०० मोमेंटम ५० इंडेक्स फंड शॉर्ट टर्ममध्ये ट्रेण्ड कायम राहण्याच्या अपेक्षेसह नुकतेच प्रबळ कामगिरी करणाऱ्या शेअर्सवर लक्ष केंद्रित करतो.''

वेगाने विकसित होत असलेल्या बाजारपेठ गतीशीलतांशी संलग्न राहण्यासाठी या इंडेक्सना सहामाहीनंतर रीबॅलन्स केले जाते. आपल्या पोर्टफोलिओमधील मूल्य व मोमेंटम धोरण समाविष्ट करण्याची इच्छा असलेले गुंतवणूकदार या फंडांमध्ये गुंतवणूक करण्याचा विचार करू शकतात.

## १२४४ युनिट रक्त संकलित केल्याबद्दल संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशनचा घाटी तर्फे सत्कार

छत्रपती संभाजीनगर : शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातर्फे आयोजित रक्तदान शिबिर संयोजक सत्कार सोहळा या कार्यक्रमात वर्षभरात सर्वात जास्त १२४४ यूनिट रक्त संकलित केल्याबद्दल संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन ला सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अधिष्ठाता शिवाजी सुक्रे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन फाउंडेशनला गौरविण्यात आले.यावेळी निरंकारी मिशन छत्रपती संभाजी नगर जिल्हा संयोजक डि जी दळवी, शिवाजी कुबडे, विजय बोडखे, वसंत महाडीक यांची उपस्थिती होती



रक्त नाडियो मे बहे नालियो मे नहीहा संदेश संपूर्ण मानवमात्राला देत सदगुरु माता सुदीक्षा जी महाराज यांच्या असीम कृपेने संत निरंकारी चैरिटेबल फाउंडेशन तर्फे रक्तदान शिबिरांचे आयोजन संपूर्ण भारतभर जिथे जिथे मिशन च्या शाखा आहेत त्याठिकाणी करण्यात येत असते दर वर्षी छत्रपती संभाजी नगर मध्ये मुख्यत्वे तीन ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात येत असते या मध्ये सिडको,सिंधी कॉलनी तसेच बजाज नगर या ठिकाणी हे आयोजन करण्यात येत असते अक्षरशः रांगा लावून या ठिकाणी रक्तदाते मोठ्या उत्साहात या ठिकाणी रक्तदान करतात.

नुकत्याच १५ ऑगस्ट ला सिडको सत्संग भवन येथे झालेल्या रक्तदान शिबिरात ५५८ दात्यांनी या ठिकाणी केले होते रक्तदान शिबिरे आयोजित करताना बरीच तयारी करावी लागते निरंकारी मिशन चे सेवादल सदस्य ही संपूर्ण तयारी करून घेतात छत्रपती संभाजी नगर चे संयोजक डी जी दळवी यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदानाच्या १ महिना आधीपासून शहरातील विविध अकॅडमी, क्लासेस, पार्क याठिकाणी जाऊन मिशन चे स्वयंसेवक नागरिकांना ला रक्तदानाचे महत्व सांगून रक्तदानाबद्दल जनजागृती करतात शहरातून भव्य वाहन रैली देखील काढण्यात येत असते.

## भूखंड नावावर करण्यासाठी लाच घेणारा एजंट जाळ्यात

छत्रपती संभाजीनगर : सिडको क्षेत्रातील भूखंड आईच्या निधनानंतर स्वतःच्या नावावर हस्तांतरित करण्यासाठी, लीज डीडची निबंधक कार्यालयात नोंदणीस सिडको कार्यालयाकडून एनओसी प्राप्त करून घेण्यासाठी ८ हजार रुपयांची लाच स्वीकारणाऱ्या एका एजंटाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) पकडले. ही कारवाई गुरुवारी (१७ ऑक्टोबर) करण्यात आली. मुनीर गनी नाईक (६५, रा. नाहेदनगर, हत्तेसिंगपुरा) असे या एजंटाचे नाव आहे. सिडकोतील वरिष्ठ अधिकाऱ्याने ही लाच मागितल्याची चर्चा असून त्या दिशेने एसीबी तपास करत आहे.

तक्रारदाराला आईच्या निधनानंतर त्यांच्या नावावर असलेला सिडको भूखंड स्वतःच्या नावावर हस्तांतरित करायचा होता. तक्रारदाराने सिडको कार्यालयात त्यासाठी अनेक चकरा मारल्या. नियमानुसार १ लाख २८ हजार २४२ रुपये शुल्काचा भरणा केला. परंतु काम होत नव्हते. त्या वेळी तक्रारदाराला मुनीर गनी नाईक भेटला. त्याने लीज डीड निबंध कार्यालयात नोंदणीस सिडकोच्या एनओसी साठी १० हजारांची लाच मागितली. तक्रारदाराने याबाबत एसीबीकडे तक्रार केली. उपअधीक्षक दिलीप साबळे, शांतीलाल चव्हाण यांनी सापळा रचला. मुनीर याने तडजोडीअंती ८ हजारांची लाच मागितली. तक्रारदाराकडून ८ हजार घेताना आरोपीला पकडले. आरोपीविरुद्ध सिटी चौक ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## अग्रलेख...

# स्वयंसेवकांवरील हल्ल्यामुळे समाजमन अस्वस्थ

राजस्थानमध्ये रा. स्व. संघाच्या स्वयंसेवकांवर झालेल्या चाकूहल्ल्यात आठ जण जखमी झाल्याची बातमी चिंताजनक म्हणावी लागेल. या घटनेचा करावा तेवढा निषेध कमी आहे. देशाची वाटचाल कोणत्या दिशेने सुरू आहे, त्याची ही घटना द्योतक म्हणावी लागेल. रा. स्व. संघाच्या शताब्दी वर्षाला यावर्षीच्या विजयादशमीपासून प्रारंभ झाला आहे. शतकमहोत्सवी वर्षाकडे वाटचाल करणाऱ्या आणि आपले संपूर्ण आयुष्य भारतमातेच्या सेवेकरिता समर्पित केलेल्या संघाच्या स्वयंसेवकांवर राजस्थानसारख्या भाजपाशासित राज्यात, त्यातही राजधानी जयपूरमध्ये चाकूहल्ला व्हावा, ही बाब देशावर प्रेम करणाऱ्यांना अस्वस्थ करणारी तर आहे; पण देशात सर्वकाही ठीक नाही, याचा संकेत देणारीही आहे. जयपूरच्या करणीविहार परिसरातील दसरा मैदानावर ही दुर्दैवी घटना घडली आहे. या मैदानाच्या बाजूला असलेल्या शिव मंदिरातील कार्यक्रमात सहभागी झाल्यानंतर संघाचे स्वयंसेवक या मैदानात शरद पौर्णिमेचा उत्सव साजरा करीत होते. स्वयंसेवकांनी भारतमातेच्या जयजयकाराच्या तसेच जय श्रीरामच्याच घोषणा दिल्या असतील. या घोषणांवर कोणी आक्षेप घेण्याचे कारण नव्हते; पण एका व्यक्तीने आक्षेप घेतला. त्यामुळे स्वयंसेवकांनी महाबली हनुमानाचे स्मरण करत हनुमान चालीसा सुरू केली. यामुळे काही माथेफिरूंचे डोके फिरले. अशाच माथे फिरलेल्या पितापुत्रांनी मैदानात येऊन आधी संघाच्या स्वयंसेवकांशी वाद घातला तसेच नंतर आपल्या जवळच्या चाकूने भोसकाभोसकी सुरू केली. हा प्रकार काही जात्यंध आणि हिंदुद्वेष्ट्या लोकांनी केला असेल, यात शंका नाही. 'जय श्रीराम' आणि 'भारत माता की जय'च्या घोषणा दिल्यामुळे तसेच हनुमान चालीसा म्हटल्यामुळे ज्यांच्या तळपायाची आग मस्तकात जाते, त्यांना या देशात कुठेही राहण्याचा अधिकार नाही. त्यांची जागा या देशात नाही तर आपल्या शेजारी देशात आहे. त्यांनी खुशाल भारतमातेचा हा देश सोडून शेजारी देशात जावे, ते आपणहून जात नसतील तर त्यांना भारत सरकारने फटके मारत सन्मानपूर्वक शेजारी देशात पोहोचवून दिले पाहिजे.

चित्रपटात होते, त्याप्रमाणे सर्व झाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि गुन्हा नोंदवून जखमींना रुग्णालयात दाखल केले. जखमींपैकी काहींची प्रकृती चिंताजनक असल्याचे समजते. नंतर या मैदानावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. हा प्रकार म्हणजे साप गेल्यावर काठीने भुई धोपटण्यासारखा म्हणावा लागेल. ज्यांना या देशातील बहुसंख्य हिंदू लोकांच्या भावनांचा, श्रद्धास्थानांचा आदर करता येत नाही, त्यांच्यासाठी या देशात जागा नाही. अल्पसंख्यक असूनही बहुजनांच्या भावना दुखावणारे कृत्य करण्याची या लोकांची हिंमतच कशी होते, आपल्या देशातील गुप्तचर संस्था काय करतात, त्यांना आधीच या घटनाक्रमाची माहिती कशी मिळत नाही, असे अनेक प्रश्न यातून उपस्थित झाले आहेत. काँग्रेस शासनाच्या काळात अल्पसंख्यकांचे लांगूलचालन केले जात होते. कारण, अल्पसंख्यकांच्या तुष्टीकरणाच्या आधारावरच देशात काँग्रेसने आताआतापर्यंत म्हणजे २०१४ पर्यंत राज्य केले. त्यानंतर सत्तेवर आलेल्या आणि हिंदुत्वाचा पुरस्कार करणाऱ्या मोदी सरकारने हिंदुत्वाचे राजकारण करताना अल्पसंख्यकांवरही अन्याय होणार नाही, याची काळजी घेतली. कारण 'सबका साथ, सबका विकास आणि सबका विश्वास' या धोरणाने या सरकारची वाटचाल सुरू आहे. मात्र, हिंदूंना डिवचण्याशिवाय देशातील काही शक्तींना चैन पडत नाही. त्यामुळे छोट्या-मोठ्या घटनांतून हिंदू बांधवांना चिथावण्याचा या शक्तींचा प्रयत्न आहे. उत्तरप्रदेशातील बहराईचसह देशाच्या काही भागांत दुर्गा विसर्जन मिरवणुकीवर दगडफेक करण्यात आली. यामुळे उत्तरप्रदेशसह देशाच्या अनेक भागांत तणावाचे वातावरण निर्माण झाले. बहराईच येथे तर भगवा झेंडा फडकवण्याच्या प्रयत्नात एका हिंदू युवकाचा बळी गेला. त्याच्यावर गोळीबार करण्यात आला. अतिशय निर्घृणपणे हालहाल करून त्याला मारण्यात आले. बहुसंख्यकांच्या या देशात अल्पसंख्यक असणारे दादागिरी करत असतील, हिंदूंच्या देव-देवतांची विटंबना करत असतील तर या देशातील हिंदूंनी बांगड्या भरल्या नाही, हे सगळ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे. हिंदू समाज हा भगवान शंकराप्रमाणे आहे. एकदा त्याचे तांडवनृत्य सुरू झाले की, तिन्ही लोकांत प्रलय आल्याशिवाय राहणार नाही. उत्तरप्रदेशातील योगी आदित्यनाथ सरकारच्या कार्यपद्धतीप्रमाणे या शक्तींना चिरडून टाकले पाहिजे. या देशातील सर्वच अल्पसंख्यक देशविरोधी आहे असे नाही, पण देशविरोधी अल्पसंख्यकांची संख्याही कमी नाही; ती वाढतच चालली आहे. ज्याप्रमाणे सगळे अल्पसंख्यक हे अतिरेकी नाही, पण सगळे अतिरेकी आणि देशद्रोही हे अल्पसंख्यक आहेत, या ऐतिहासिक तथ्याकडे आपल्याला दुर्लक्षही करता येणार नाही.

रा. स्व. संघ ही राष्ट्रवादी संघटना आहे. भारतमातेला परम वैभवाप्रती पोहोचविण्यासाठी गेल्या ९९ वर्षांपासून ही संघटना काम करीत आहे. ही संघटना बहुसंख्यक हिंदूंची असली, तरी ती जात-पात, धर्म-भाषा, प्रांत-लिंग असा कोणताही भेद मानत नाही. या देशात राहणारे मग ते आज कोणत्याही जाती-धर्माचे असो, सर्वच हिंदू आहेत, यावर या संस्थेचा ठाम विश्वास आहे. आज जे लोक स्वतःला दुसऱ्या धर्माचे म्हणवतात, त्यांचे पूर्वजही कधीकाळी हिंदूच होते, असा संघाचा विश्वास आहे. नुसता विश्वासच नाही तर संघ या भावनेने गेल्या ९९ वर्षांपासून काम करत आहे आणि पुढेही काम करणार आहे. देशात कुठेही नैसर्गिक वा अन्य प्रकारची आपत्ती आली तर जात-पात आणि धर्म न पाहता सगळ्यात प्रथम संघाचे स्वयंसेवक धावून जातात आणि निःस्वार्थ भावनेने पीडितांना मदत करतात, याचा अनुभव देशाने अनेक वेळा घेतला आहे. अशा या संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ला होणे हे समजण्याच्या पलीकडे आहे. आतापर्यंत डाव्यांचे प्राबल्य असणाऱ्या केरळमध्ये संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ले होत होते. त्यात अनेक स्वयंसेवकांना आपल्या प्राणालाही मुकावे लागले. पण तरीही केरळमधील स्वयंसेवक कधी घाबरला नाही आणि त्याने माघारही घेतली नाही. आजही तो केरळमधील डाव्यांच्या दादागिरी आणि गुंडगिरीविरोधात लढत आहे, संघर्ष करत आहे. केरळमधील हे लोण आता राजस्थानपर्यंत आले, ही चिंतेची बाब म्हणावी लागेल. भाजपाशासित राज्यात संघाच्या स्वयंसेवकांवर होणारे हल्ले हे देशभर वेगळा आणि नकारात्मक संदेश देणारे ठरणार आहेत. त्यामुळे भाजपा सरकारवरची जबाबदारी वाढणार आहे. मुळात कोणत्याही राज्यात भाजपाचे सरकार असो की भाजपाविरोधी पक्षांचे, तेथे संघाच्या स्वयंसेवकांवर हल्ले होणार नाही, याची काळजी तेथील सरकारला घ्यावी लागणार आहे. कारण संघाचे स्वयंसेवक स्वतःच्या व्यक्तिगत फायद्यासाठी वा स्वार्थासाठी काही करत नाहीत, तर ते जे करतात, ते व्यापक समाजाच्या आणि देशाच्या हिताचे असते. २०१४ मध्ये नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यानंतर त्यांनी देशाला विश्वगुरू बनवण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. मोदी देशाला विश्वगुरू बनवतात, ही बाब या देशातील काही लोकांना पचत आणि पटत नसावी. त्यामुळे देशात अशांततेचे तसेच जातीय तणावाचे वातावरण निर्माण करण्याचा काही देशविघातक शक्तींचा प्रयत्न राहू शकतो. देशातील सामाजिक सौहार्दतेची वीण कमकुवत करण्याचा या शक्तीचा हा प्रयत्न आहे, यात शंका नाही. जयपूरमध्ये संघाच्या स्वयंसेवकांवर झालेल्या प्राणघातक हल्ल्याने देशभरातील हिंदूंमध्ये अस्वस्थतेची भावना आहे. पण यामुळे हिंदू समाज रस्त्यावर उतरणार नाही, हिंदू समाजाने रस्त्यावर यावे, अशी इच्छा हा प्रकार घडवून आणणाऱ्यांची नक्कीच असू शकते. पण संघ असे काही करणार नाही आणि संघाचे स्वयंसेवकही असे कधीच करणार नाहीत. आपल्या हाताने आपला देश कमकुवत करण्याचा कोणताही प्रयत्न संघाचे स्वयंसेवक हाणून पाडतील, त्यासाठी वेळप्रसंगी आपल्या प्राणांचे बलिदानही करतील. देशभक्तीने ओतप्रोत स्वयंसेवक हे संघाचे वैशिष्ट्य आहे. संघ समजून घ्यायचा असेल तर तो दुरून समजणार नाही. त्यासाठी दररोज संघात जावे लागेल. तेव्हाच संघाचे स्वयंसेवक कोणत्या मातीचे तयार झाले, ते समजू शकेल. ▮


## यंगिस्तान

**जयेश शत्रुघ्न मेस्त्री**

# दैवी देणगीचा वापर कसा करावा?

'द कार्स' नावाच्या कार्टुन चित्रपटांची अतिशय सुंदर सीरिज आहे. त्यातील तिसऱ्या भागाची कथा अशी की, लाईटनिंग मॅकविन नावाची कार ही हीरो असते. ही कार अनेक वर्षे रेसिंग स्पर्धा जिंकते. पण अचानक स्टॉर्म नावाची अत्यंत आधुनिक कार स्पर्धेत सहभागी होते आणि मॅकविन कारचा पराभव होतो. मग मॅकविन ट्रेनिंग घेण्यासाठी स्टर्लिंगकडे येतो; जिथे क्रूझ ही नुकतीच वयात आलेली कार त्याला प्रशिक्षण देते. क्रूझला रेसर व्हायचं असतं, पण ते तिला जमत नाही म्हणून ती ट्रेनर होते. मॅकविनला मात्र आधुनिक तंत्र शिकताना खूप अडचणी येतात, तरीदेखील त्यावर मात करत प्रशिक्षण पूर्ण करतो. मॅकविन चॅम्पियन असलेल्या स्टॉर्मला हरवून जिंकते. मॅकविनला कळतं की, आयुष्यभर अपमान सहन करत बसण्यापेक्षा किंवा नव्या पिढीसोबत लढत बसण्यापेक्षा आता निवृत्त होऊन नव्या पिढीला आशीर्वाद दिले पाहिजे आणि त्यांचे मार्गदर्शन केले पाहिजे.

नुकतेच शरद पवार यांनी एक विधान केले आहे. पवार म्हणाले, ८४ असो किंवा ९० असो; हे म्हातारं काही थांबत नाही. हे म्हातारं महाराष्ट्राला योग्य मार्गावर आणल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. पहिली गोष्ट देवाने कोणाला किती आयुष्य द्यावे, यात आपण ढवळाढवळ करू शकत नाही. कुणी अल्पायुषी ठरतं तर कुणी दीर्घायुषी जगतं. राज ठाकरे म्हणतात त्याप्रमाणे शरद पवारांचा देवावर विश्वास नसला, तरी मी त्यांच्या दीर्घायुष्यासाठी देवाकडे प्रार्थना करतो. शरद पवारांनी शंभरी पार करावी, अशी माझी मनापासून इच्छा आहे. पण हे झालं वैयक्तिक आयुष्य. ही परमेश्वराची देणगी आहे. पण आपण दीर्घायुषी जीवन जगताना काय केलं, हे आपलं कर्तृत्व आहे. दुर्दैवाने छत्रपती शिवाजी महाराजांना दीर्घायुष्य लाभलं नाही, पण त्या अल्पायुषी जीवनातच महाराजांनी मानव जातीला हजारो वर्षे उपयोगी पडेल असं कार्य करून ठेवलं आहे. औरंगजेबाला दीर्घायुष्य लाभलं, पण त्याच्या आयुष्याची माती झाली. मराठी माणसाने त्याची कबर महाराष्ट्रात खोदली. त्याला महाराष्ट्र जिंकता आला नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांना दीर्घायुष्य लाभलं. मात्र राजकारणातून बाजूला होत त्यांनी प्रबोधनाची चळवळ सुरूच ठेवली. नेहरू हे दीर्घायुषी होते. पण ठिकठिकाणी नेहरूंची जयंती किंवा पुण्यतिथी उत्साहाने साजरी होताना दिसत नाही. शासकीय नियम आहे म्हणून करावी लागते. पण छत्रपती शिवाजी महाराज आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांची जयंती व पुण्यतिथी सर्वसामान्य माणूस उत्साहाने साजरी करतो. दीर्घायुष्यापेक्षा जे जीवन आपण कसे जगलो आहोत, त्यात आपण काम काय केलं, हे जास्त महत्त्वाचं.



देशाच्या स्वातंत्र्यासाठी भगतसिंग विशीतच फासावर चढला. ज्ञानेश्वर माउलींनी आपलं कर्तव्य पूर्ण झाल्यावर विशीतच संजीवनी समाधी घेतली. बरं, या संजीवनी समाधीवर शरद पवारांच्या वैचारिक तालमीत तयार झालेले लोक टीका करतात आणि कोणताही पुरावा नसताना ब्राह्मणांनीच त्यांची हत्या केली, तुकोबांची हत्या ब्राह्मणांनी केली, असा प्रचार करून जातिभेद निर्माण करतात. शिवाजी महाराजांच्या सैन्यात ५७ टक्के मुस्लिम होते, असा जावईशोध लावतात. प्रभू राम आणि स्वामी समर्थांवर उघडपणे टीका करणाऱ्याला पवार मूक आशीर्वाद देतात. ब्राह्मणांनी स्त्री शिक्षणाला विरोध केला व फुलेंना तीव्र विरोध केला, असा प्रचार केला जातो. पण ज्या भिडे नावाच्या ब्राह्मणाने फुलेंना स्त्री शिक्षणासाठी वाडा दिला, त्याचं चरित्र का सांगितलं जात नाही? मग जेव्हा आम्ही तरुण मंडळी शरद पवारांविषयी लिहायला बसतो, तेव्हा आम्हाला सुचत नाही की, नेमकं चांगलं काय लिहावं? आमचं ज्ञान कमी पडत असेल तर आम्ही मार्गदर्शन घ्यायला तयार आहोत. आम्हाला त्यात कोणताही कमीपणा वाटत नाही.

शरद पवार इतकी वर्षे राजकारणात आहेत. चार वेळा मुख्यमंत्री होते. देवेंद्र फडणवीस सोडले तर इतर मुख्यमंत्री त्यांच्या मर्जीतले होते. आजही पवार राजकारणात आहेत, सत्ता नसली तरी राजकारणावर त्यांचा प्रभाव आहे. ते भाकरी फिरवू शकतात. हे खरं असलं तरी या सर्व गोष्टींचा जनतेला काय फायदा? शरद पवारांचं राजकारणात प्रस्थ आहे, यापलीकडे पवारांविषयी कुणीच काही बोलत नाही. त्यांचे मर्जीतले लोकही बोलत नाहीत. इतक्या वर्षांत पवारांनी असं कोणतं धोरण राबवलं, ज्यामुळे महाराष्ट्राचा कायापालट झाला? आज पवार विद्यमान सरकारवर टीका करत आहेत, पण प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत व अधिक काळासाठी सत्तेवर असताना असा कोणता चमत्कार पवारांनी करून दाखवला आहे, ज्याचा परिणाम किमान शंभर वर्षे टिकून राहणार आहे? नरेंद्र मोदींनी ३७० कलम हटवल्यानंतर अब्दुल्ला यांना भारतीय संविधानाला समोर ठेवून शपथ घ्यावी लागली, हे मोदींचं कर्तृत्व आहे. हा दीर्घकाळ टिकणारा परिणाम आहे, हे देश एकसंध ठेवणारं कर्तृत्व आहे.

ज्याप्रमाणे मोदी 'मन की बात' हा कार्यक्रम राबवतात, त्याप्रमाणे शरद पवारांचे असे कोणते विचार आहेत, ज्यामुळे जाती-जातीतील भांडणे मिटतील, ज्यामुळे तरुण पिढी घडेल, तरुण पिढीला मार्गदर्शन होईल, महाराष्ट्राचं आनंदवनभुवन होईल? शरद पवारांचे असे कोणतेही विचार, मार्गदर्शक तत्त्वे लेख लिहिताना आपल्याला आठवत नाहीत, हे दुर्दैव आहे.

आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात खासदार उदयनराजे भोसले म्हणाले, पवारांनी आजवर केवळ राजकारण केले. राज्याला विकासापासून कायम दूर ठेवत स्वतःच्या राजकीय फायद्यासाठी राज्यात जाती-जातींमध्ये भांडण लावण्याचे ठोस काम केले. अनेक वर्षे केंद्र आणि राज्यात सत्ता असताना, चार वेळा मुख्यमंत्री असतानाही पवारांच्या कार्यकाळात राज्य मागे पडले. अन्य छोटी छोटी राज्ये महाराष्ट्राच्या पुढे गेली. याला सर्वस्वी पवार जबाबदार आहेत. उदयनराजे काही वर्षांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. त्यांनी पवारांचं राजकारण जवळून पाहिलेलं आहे. या वक्तव्याचा गांभीर्याने विचार व्हायला हवा. काही साहित्यिक, राजकीय नेते, कलाकार शरद पवारांना जाणता राजा वगैरे म्हणतात. पण पवारांची स्तुती करणे, पवारांच्या मर्जीत राहणे ही काय पात्रता आहे का? योग्यतेचे हे मापदंड आहेत का? पवार शाहू, फुले, आंबेडकरांचं नाव घेतात. हे तिन्ही महापुरुषच होते. पण पवारांनी यांचं नाव घेत महाराष्ट्र जोडला का? सर्व जातींना एकत्र आणलं का? या तिन्ही महापुरुषांचे तत्त्व महाराष्ट्राच्या भूमीत रुजवले का? की केवळ राजकारणासाठी त्यांचं नाव घेतलं? याची स्पष्टता या पितामहांनी दिली पाहिजे.

प्रिय वाचकहो, वयोवृद्ध असण्याचं महत्त्व काय हे मी तुम्हाला सांगतो. ज्यावेळी तानाजी रणांगणात पडले. तेव्हा वयोवृद्ध शेलार मामांनी नेतृत्व केलं आणि गड जिंकून दिला. आपण 'गड आला पण सिंह गेला' असं म्हणतो. पण वयोवृद्ध शेलार मामा नसते, तर गडही गेला असता ना! एका म्हाताऱ्या माणसाने आपल्याला गड जिंकून दिला, हे इतिहासातलं केवढं तरी मोठं उदाहरण आहे. बरं, गड जिंकल्यानंतर शेलार मामांनी स्वतःचा दबदबा निर्माण केला नाही, स्वतःच्या मर्जीतली माणसे बसवली नाहीत, स्वतःला जाणता राजा म्हणवून घेतलं नाही. याला म्हणतात निष्काम कर्मयोग! दीर्घायुष्य म्हणजे मिळकत नव्हे. ही देवाची देणगी आहे. या देणगीचा वापर आपण कसा करतो, हे आपल्यावर अवलंबून असतं. दीर्घायुष्य शाप ठरावं की वरदान, हे आपल्याच हातात आहे. कै. वामनराव पै म्हणून गेले आहेत ना, तुच आहेस तुझ्या जीवनाचा शिल्पकार! ▮

writerjayeshmestry@gmail.com

## वेध

**विजय कुळकर्णी**

# अन्न हे पूर्णब्रह्म

*जीवन करी जीवित्वा अन्न हे पूर्ण ब्रह्म ।*
*उदरभरण नोहे जाणीजे यज्ञकर्म ॥*

या श्लोकानुसार भारतीय संस्कृतीत अन्नाला पूर्ण ब्रह्म म्हटले आहे. अन्न हे केवळ पोट भरण्यासाठी नव्हे, तर यज्ञकर्म म्हणून ते सेवन केले पाहिजे. यज्ञकर्म केल्याने पुण्याची प्राप्ती होते, असे म्हणतात. त्याप्रमाणे आपले शरीरदेखील यज्ञकुंड असून त्याचे योग्य पोषण होण्यासाठी भोजन करणे म्हणजे एक प्रकारचे यज्ञकर्मच आहे.

हे सर्व येथे मांडण्याचा उद्देश असा की, १६ ऑक्टोबर हा जागतिक अन्न दिवस म्हणून जगभर साजरा केला गेला. तसे पाहिले तर, 'डे' साजरे करणे ही पाश्चिमात्य संस्कृती आहे. मदरर्स डे, फादरर्स डे, त्याप्रमाणे पाश्चिमात्य देश 'फूड डे' म्हणजे 'अन्न दिन' साजरा करतात. आपण भारतीय अन्नाला देव मानतो. आपण अन्नाचा कधीच अपमान करीत नाही. आपल्या थोर ऋषी-मुनींनी अन्न उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्याला 'अन्नदाता' म्हटले आहे. त्याला शेती कामात मदत करणाऱ्या 'वृषभ' म्हणजे बैलालादेखील 'नंदी' म्हणून देवत्व बहाल केले आहे. त्यांचा सन्मान करण्याची शिकवण दिली आहे. अनेक श्लोक, ऋचा, मंत्रातून आपल्याला अन्नाची महती कळते. मात्र, आज काळ वेगाने बदलत आहे. पूर्वी लग्न समारंभ अथवा इतर कार्यक्रमात पंक्तीत भोजन देण्याची पद्धत होती. आजही ती कायम असली, तरी फारच कमी ठिकाणी तिचा अवलंब केला जातो. आता लग्न समारंभात बुफेची पद्धत रूढ झाली आहे. पूर्वी घराघरांत माजघरात पाटावर बसून भोजन करण्याची पद्धत होती. आता अनेक ठिकाणी डायनिंग टेबलवर जेवणाची पद्धत आली आहे. त्यासाठी डायनिंग हॉल तयार केला जातो. टेबलवर बसून पायात जोडे, चप्पल घालून भोजन ग्रहण केले जाते. आजही काही लोक भोजनाचे नियम पाळतात. जेवण सुरू करण्यापूर्वी ताटाभोवती पाणी फिरवून देवाला नैवेद्य दाखविला जातो. भाताची काही शितं 'चित्रावती' म्हणून ताटाच्या बाजूला टाकली जातात. देवाचे नामस्मरण, श्लोक म्हटला जातो. मात्र, आता हे करताना फारसे कुणी दिसत नाही. ताट वाढले की, सरळ जेवण सुरू केले जाते. याला घरातील ज्येष्ठ मंडळीदेखील जबाबदार आहेत. त्यांनी ताटाभोवती पाणी न फिरविता भोजन सुरू करणाऱ्या आपल्या कुटुंबातील सदस्याला हटकले पाहिजे. तसे केल्यास अन्नाचा सन्मान राखला जाईल. आपल्याला हवे तेवढेच घ्यायला मुलांना शिकविले पाहिजे. पानात काहीही शिल्लक राहायला नको, असे मुलांना सांगितले पाहिजे. पूर्वी पानात वाढलेले चांगले तूप अगदी निपटून खायला लावत. तूप मोरीत जायला नको, असे बजावले जाई. आमच्या लहानपणी आमचे वडील जो पानात काहीही शिल्लक ठेवणार नाही त्याला बक्षीस मिळेल, असे सांगत. त्यामुळे आम्हाला पानात काहीही न टाकण्याची सवय लागली. आज हे सर्व लुप्त होत असल्याचे दिसून येत आहे. पूर्वीच्या अन्नधान्याचे नियोजन केले जात असे. काटकसरीने त्याचा वापर केला जात होता. त्यामुळे अन्नाची नासाडी होत नव्हती. आज बुफे ज्याला मराठीत 'स्वरुची भोज' म्हणतात. वास्तविक, स्वरूची या नावातच त्या भोजन पद्धतीचा अर्थ आहे. आपल्याला आवडेल ते म्हणजे स्वरूची. पण, आपण काय करतो. पुन्हा त्या रांगेत उभे राहायला नको म्हणून आपल्या प्लेटमध्ये सर्व पदार्थ एकदाच गच्च भरून घेतो. मग, त्यातील मोठ्या प्रमाणात अन्न टाकून दिले जाते आणि □अन्नाची नासाडी होते. आपल्या ताटात तेवढे घ्या की जेणेकरून ते नालीत टाकले जाणार नाही. 'अन्नदाता सुखी भव' 'पाककर्ता सुखी भव' असे जेवण झाल्यावर आपण म्हणतो. कारण तो अन्न पिकविणारा आणि अन्न तयार करणाऱ्याचा सन्मान आहे. आज अन्नाची होत असलेली नासाडी पाहून खंत वाटते. आजही असे अनेक लोक आहेत ज्यांना दोन वेळचे अन्नही मिळत नाही. संतुलित आहार मिळत नसल्याने आदिवासी भागातील मुलं मोठ्या संख्येत कुपोषित आहेत. त्यामुळे दुर्गम भागातील बालकांचे मृत्यू होतात. याची गंभीर दखल घेऊन जागतिक अन्न व कृषी संघटनेने १९८१ पासून जागतिक अन्न दिनाचे आयोजन करणे सुरू केले आहे. श्री गजानन महाराजांनी उष्ट्या पत्रावळीवरील अन्नाचे कण वेचून आपली भूक भागविल्याचे श्री गजानन विजय ग्रंथात नमूद आहे. या कृतीतून त्यांनी अन्नाचे महत्त्व पटवून दिले आहे. नुकत्याच झालेल्या एका सर्वेक्षणात कॉफी, समोसे, चिप्स इत्यादी खाणाऱ्यांची संख्या भारतात खूप मोठी आहे. त्यामुळे भारतात मधुमेहींची संख्या झपाट्याने वाढत आहे. तेव्हा अन्न दिनानिमित्त आपण सर्वांनी यावर गंभीर विचार करणे आवश्यक आहे. काही वर्षांपूर्वी 'तरुण भारत'ने 'अन्न वाचवा' ही मोहीम संपूर्ण विदर्भात राबविली होती. त्याला मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळाला होता, हे येथे आवर्जून नमूद करावेसे वाटते. तेव्हा आजपासूनच आपण 'इतनाही लो थाली मे, व्यर्थ न जाए नाली मे' अशी काळजी घेण्याचा संकल्प करू या! ▮

८८०६००६१४९

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# उबाठाचे उद्योग उघडे पडले!

महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवून नेल्याचा डांगोरा सातत्याने पिटणाऱ्या उद्धव ठाकरे गटाचे उद्योग आता उघडे पडल्याचे चित्र आहे. मुळात राज्यातून गेलेले उद्योग तर खऱ्या अर्थाने यांच्या तीन वर्षांच्या जुलमी राजवटीला आणि वसुलीच्या उद्योगांना वैतागून पळाले नव्हे तर त्यांना पळून जाण्यास बाध्य करण्याचा बहुमान तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंच्या नावे आहे. मात्र, आता गंगा उलटी वाहू लागली आहे. महाराष्ट्रातील उद्योग गुजरातला पळवले जात असल्याचा गैरसमज निर्माण करणाऱ्या विरोधकांना चांगलीच चपराक बसली आहे. राज्याचे उपमुख्यमंत्री तसेच ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीमुळे आखलेल्या ऊर्जा धोरणाचा परिणाम आता दिसू लागला आहे. विजेचे दर परवडत नाहीत म्हणून गुजरातच्या सूरत आणि दक्षिण गुजरातमधील अनेक कापड उद्योग महाराष्ट्रातील नवापूर आणि नंदुरबार येथे स्थलांतरित होत आहेत.

कापड उद्योग जगतातील माहितीनुसार, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या नवापूर औद्योगिक नगरीमध्ये सूरतमधल्या उद्योगपतींच्या मालकीचे १३० कापड कारखाने आले आहेत. आणखी दोन डझनहून जास्त उद्योजक सूरतपासून अवघ्या १०० किलोमीटर अंतरावर असलेल्या नवापूरला येण्यास उत्सुक आहेत. नवापूरपासून ६० किलोमीटर अंतरावर असलेल्या नंदुरबारमधील भालेर एमआयडीसीही अनेकांच्या पसंतीला उतरत आहे.

सुरतमधील कापड उद्योगांना मिळणारी वीज प्रती युनिट साडेआठ रुपये दराने मिळत आहे. याउलट महाराष्ट्र सरकारच्या अनुदानामुळे महाराष्ट्रात हा दर तीन ते साडेपाच रुपये प्रती युनिट आहे. याव्यतिरिक्त सुरतच्या तुलनेत नवापूरमधल्या जमिनी स्वस्त आहेत आणि महाराष्ट्रात करही कमी आहेत. गुजरातचे मागचे वस्त्रोद्योग धोरण गेल्या वर्षी डिसेंबरमध्ये संपल्यानंतर गुजरातमधल्या उद्योजकांनी महाराष्ट्राच्या वस्त्रोद्योग धोरणावर लक्ष केंद्रित केले. तब्बल १० महिन्यांनंतर गुजरात सरकारने नुकतेच नवीन वस्त्रोद्योग धोरण जाहीर केले. मात्र अद्याप त्याचा संपूर्ण मसुदा वेबसाईटवर अपलोड केलेला नाही. वेबसाईटवर फक्त माहितीपत्रक प्रकाशित करण्यात आले आहे.

महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्रात येऊ घातलेले काही उद्योग तेव्हाच्या सरकारच्या निष्क्रियतेमुळे इतर राज्यात गेले. मात्र याचे खापर त्यांनी राज्यातल्या सत्ताधारी महायुती सरकारवर फोडण्याचा प्रयत्न केला. तेव्हाच परराज्यातले उद्योग महाराष्ट्रात परत आणण्याचे स्थगित ठेवण्यात आलेले धोरण सरकारने पुन्हा स्वीकारले. उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी याकरिता विशेष पुढाकार घेतला. त्याचे फळ आता मिळू लागले आहेत, अशी भावना उद्योग जगतात व्यक्त होत आहे.

देशातल्या परकीय गुंतवणुकीतही महाराष्ट्र अग्रेसर राहिला आहे. एप्रिल ते जून २०२४ या चालू आर्थिक वर्षातल्या पहिल्या तीन महिन्यांतच जी आकडेवारी समोर आली, त्यामध्ये देशात झालेल्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी तब्बल ५२.४६ टक्के गुंतवणूक एकट्या महाराष्ट्रात झाली आहे. गेली दोन वर्षे सातत्याने परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर राहिला आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत महाराष्ट्रात ६९ हजार ७९५ कोटींची परकीय गुंतवणूक आली. दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या कर्नाटकमध्ये १९ हजार ५९ कोटींची परकीय गुंतवणूक आली. तिसऱ्या क्रमांकावरील दिल्लीत १० हजार ७८८ कोटींची गुंतवणूक झाली. चौथ्या क्रमांकावरच्या तेलंगणात ९ हजार २३ कोटींची परकीय गुंतवणूक झाली. पाचव्या क्रमांकावर गुजरात असून त्यांची परकीय गुंतवणूक ८ हजार ५०८ कोटी आहे.

या सर्व राज्यांमध्ये झालेल्या परकीय गुंतवणुकीची बेरीज केली तर त्यापेक्षाही जास्त गुंतवणूक फक्त महाराष्ट्रातच झाली आहे. देशात यावेळी आलेली परकीय गुंतवणूक १ लाख ३४ हजार ९५९ कोटी रुपये असून त्यापैकी ५२ टक्के रक्कम केवळ महाराष्ट्रात गुंतवण्यात आली आहे. २०२२-२३ मध्ये महाराष्ट्रात १ लाख १८ हजार ४२२ कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक आली होती. ही गुंतवणूक त्यावेळच्या कर्नाटक, दिल्ली आणि गुजरातच्या एकत्रित गुंतवणुकीच्या बेरजेपेक्षाही जास्त होती. २०२३-२४ मध्ये महाराष्ट्रात १ लाख २५ हजार १०१ कोटींची परकीय गुंतवणूक आली; जी गुजरातपेक्षा दुपटीहून अधिक आणि गुजरात तसेच कर्नाटक यांच्या बेरजेहून अधिक आहे.

एखाद्या राज्यात परकीय गुंतवणूक तेव्हाच येते जेव्हा तिथले वातावरण उद्योगाला अनुकूल असते. त्यांना स्वस्तात जमीन, वीज, पाणी उपलब्ध होते की नाही, हे पाहिले जाते. स्वस्त दरात मनुष्यबळ मिळते की नाही, हे बघितले जाते. पायाभूत सुविधा आहेत की नाही ते पाहिले जाते. सामाजिक सलोखा राखला जातोय की नाही, हे बघितले जाते आणि असा माहोल तयार करण्यात हे सरकार यशस्वी झाले आहे. फडणवीस मुख्यमंत्री असतानाच त्यांनी राज्यातल्या पायाभूत सुविधांवर भर दिला. मुंबई-नागपूर समृद्धी महामार्ग उभारण्याचे काम त्याच काळात सुरू झाले. मुंबई-पनवेलपर्यंत जाणारा अटल सेतूची बांधणी तेव्हाच सुरू झाली. या महामार्गांना आसपासचे जिल्हे जोडण्याचे काम हाती घेण्यात आले. रस्त्यांचे, रेल्वेचे जाळे विकसित होत असेल तर दळणवळण सोपे होते, हे गुंतवणूक करणारेही जाणतात. गुंतवणुकीला आकर्षित करण्यासाठी त्यांनी तेव्हाच काही शॉर्टटर्म तर काही लाँगटर्म योजना आखल्या. महाविकास आघाडीच्या काळात या योजनांना ब्रेक लागले. सत्तापालट झाला आणि पुन्हा या योजनांना गती आली व त्याचे परिणाम आता दिसत आहेत.

फडणवीस मुख्यमंत्री असताना २०१४ ते २०१९ या काळात महाराष्ट्रात एकूण ३ लाख ६२ हजार १६१ कोटींची परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात आली होती. २०२० आणि २०२१ मध्ये महाराष्ट्रात महाविकास आघाडीचे सरकार होते. त्या काळात महाराष्ट्र परकीय गुंतवणुकीत मागे पडला होता. या काळात गुजरात आणि कर्नाटक महाराष्ट्रापेक्षा पुढे गेले होते. महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आल्यानंतर तेव्हाच फडणवीस यांनी जाहीर केले होते की, पाच वर्षांतली गुंतवणूक आम्ही अडीच वर्षांत आणून दाखवू आणि सरकारची पावलेही त्याच दिशेने पडताना दिसत आहेत. दुसऱ्या तिमाहीतल्या परकीय गुंतवणुकीचा आकडा अजून जाहीर व्हायचा आहे. हा आकडा आल्यावर गुंतवणुकीची आकडेवारी आणखीनच वाढलेली दिसेल. पण धृतराष्ट्राच्या भूमिकेत असणाऱ्या उद्धवना दिसणार नाही. कारण धृतराष्ट्राला वस्तुस्थितिदर्शक माहिती देणारा संजय आणि उद्धव ठाकरेंना आभासी माहिती देऊन दिशाभूल करणारा घरगडी संजय यात फार फरक आहे. ▮

९२७०३३३८८६

### मतदान सक्तीचे असावे का?

निवडणुकीची तारीख जाहीर झाली. एक म्हणावेसे वाटते की, मतदान सक्तीचे असावे. लोकसभेच्या निवडणुकीची मतदान टक्केवारी काही ठिकाणी खूपच कमी होती. लोकसभेच्या मतदानाला गेलो असताना तिथे एक आजोबा आले होते. थरथरत होते. त्यांनी आपला हक्क बजावला. त्याच दिवशी एका ओळखीच्याचा फोन आला होता. ते म्हणाले, आम्ही गेलोच नाही मतदान करायला. त्यांच्याकडची चार मते होती. शुक्रवारी मतदान. तीन दिवस काही जण बाहेरगावी गेले. मोठ्या शहरात सुशिक्षित लोक मोठ्या प्रमाणात मतदान करीत नाहीत. सुटी दुसरीकडे घालवतात. म्हणून मतदान सक्तीचे केले तर योग्य होईल का? नवीन जे मतदानाकरिता पात्र झाले आहेत, त्यांच्यामध्येसुद्धा उत्साह नाही. आपले नाव सामील करायची इच्छा निर्माण व्हायला हवी. काही करून मतदानांची टक्केवारी वाढायला हवी. जुन्या पिढीतील लोक बरेच उत्साही आहेत. मतदान करतात. तरुणही उत्साही आहेत; पण प्रमाण वाढायला हवे. उदासीनता कमी व्हायला हवी.

**प्रा. अंजली पळणीटकर**/९८२२६९१२८८

### ऑनलाईन टॅक्स भरणा

आजकाल सर्व कार्यालयीन कामकाज, पैशाचे व्यवहार ऑनलाईन केल्यामुळे जनतेला दिलासा मिळाला आहे. मग ते रेल्वे तिकीटचे रिझर्व्हेशनच असो वा बँकेमार्फत होणारा पैशाचा व्यवहार असो. भाजी बाजारात भाजी घेणे असो की फळवाल्यांकडून फळे विकत घेणे असो यूपीआयद्वारा व्यवहार सुलभ झाला आहे. जिल्हास्तरावर नगरपालिकांचेसुद्धा टॅक्स वसुली वा भरणा ऑनलाईन झालेला आहे. तहसील स्तरावर हा टॅक्स व्यवहार ऑनलाईन झालेला ऐकिवात नाही. ज्या शहराची वा गावाची लोकसंख्या ५० हजार वा एक लाखावर आहे आणि जेथे नगरपालिका टॅक्स वसूल करते त्याचा भरणा करण्यासाठी लोकांना एक-दोन किमी असलेल्या नगरपालिकेत जाऊन भरणा करावा लागतो. कारण आजकाल दूर-दूर कॉलनी व नगरे बसलेली आहे त्यामुळे टॅक्स भरण्यासाठी नगरपालिकेत जाऊन टॅक्स भरणे त्रासाचे झाले आहे. म्हाताऱ्यांना व आजारी असणाऱ्या व्यक्तींना जाणे अवघड होते वा ज्यांची घरे नगरपालिका क्षेत्रात आहे, परंतु ते लोक दुसऱ्या गावी राहत आहे, त्यांना टॅक्स भरणे अडचणीचे आहे. त्यामुळे नगरपालिकेने टॅक्सच्या भरणा करण्यासाठी मोबाईलद्वारे ऑनलाईन भरण्याची सुविधा नागरिकांसाठी करावी; जेणेकरून नगरपालिका कर्मचाऱ्यांना टॅक्स वसुलीसाठी घरोघरी जावे लागणार नाही व त्यांच्याही त्रास कमी होईल.

**मधुसूदन भावे**/७६२०६२९७२८

## वाचक पत्रे

●● ●●

### 'एक्झिट पोल' शुद्ध मूर्खपणा

मुख्य निवडणूक आयुक्तांनी एक्झिट पोलसंबंधी तीव्र नाराजी व्यक्ती केली; ती यथार्थ वाटते. एक्झिट पोल हे विशिष्ट पक्षांचा कल दाखविण्याचा मूर्खपणा नक्कीच करतात, हेच अनेकदा सिद्ध झालेले आहे. मग त्या चुकीच्या दर्शविलेल्या भविष्याची जबाबदारी या एक्झिट पोल कंपन्या का स्वीकारीत नाहीत? जनतेने केलेल्या मतदानाचा निकाल दोन-तीन दिवसांत येणारच असतो; मग हा करोडोंचा खर्च कशासाठी? आणि स्टुडिओमध्ये काही नेत्यांना बोलावून जनतेला भांडणे कशाला ऐकविली जातात? जनतेची करमणूक, निराशा, वेळेचा अपव्यय एवढेच होते. हे प्रकरण गंभीर असून 'विश्वास' या शब्दाला काळिमा लागतो. म्हणून त्यावर वेळेतच कडक कायदा आणणे अत्यंत गरजेचे वाटते.

**अमोल करकरे**/९९६७९२७६१७

●● ●●

### भारत : तिसरी आर्थिक महासत्ता

आपल्या देशाने २०१४ पासून पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात आर्थिक विकासाबरोबरच सर्वच क्षेत्रात वेगाने प्रगतीकडे वाटचाल सुरू केल्यासंबंधीचे वृत्त तरुण भारतात वाचले. भारतात जुनी राजकीय पद्धत कसेही करून राजकारणात जम बसवा व माया कमावून आपल्या येणाऱ्या सात पिढ्या आरामात कशा चैन करतील, याची तजवीज करा, या तत्त्वावर आधारित होत्या. देशाचा विकास व प्रगती, याचा विचार त्यांच्या गावीही नव्हता, असे मागील काही काळात झालेल्या महाप्रचंड घोटाळ्यावरून दिसते. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे सामान्य जनतेसाठी याबद्दल काही वाईट वाटत नव्हते. यामुळे सत्ताधारी माजलेत व भ्रष्टाचार वाढत गेला. तोपर्यंत भारत देश जगाच्या खिजगणतीत नव्हता. पण आता मोदींच्या राष्ट्रीय राजकारणात आगमनानंतर परिस्थिती बदलत गेली व भारत देश आंतरराष्ट्रीय स्तरावर स्पर्धेत उतरला. कोरोना काळात जगात आर्थिक मंदी आली. जगातील मोठमोठे देश व उद्योगधंदे डबघाईला आले. भारत मात्र या संकटकाळातून लवकरच बाहेर पडला. एवढेच नव्हे, तर स्वतःची परिणामकारक लस तयार केली. ही लस भारतीय निर्मात्यांनी इतर विकसनशील व काही पुढारलेल्या देशांनाही पाठविली व भारताची मान जगात उंचावली. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे भारतीय मतदारांत शिक्षित व तरुण मतदारांची संख्या वाढत गेली. देशाची सर्वंकष प्रगती व विकास देशाला जागतिक स्पर्धेत आवश्यक आहे, हे त्यांना कळते. हा एक प्लस पॉईंट आहे. तरी पण अजूनही काही अज्ञानी व देशविरोधी तत्त्व भारतात आहेत. ते व जुनाट विचारांचे राजकारणी देशाच्या प्रगतीत आडकाठी टाकत असतात. त्यांना नामोहरण करून आपला भारत २०३० पर्यंत जगात आर्थिक क्षेत्रात तिसरा क्रमांक गाठेल, याकरिता आपण सर्व प्रयत्न करू या व ते ध्येय गाठण्यास सरकारला मदत करूया... ▮

**गणेश ज. हजारे**/८६९८८१५५५९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# संत चोखामेळा ट्रस्टच्या जागेतील अतिक्रमण हटवण्यासाठी बौद्ध समाज एकवटला

## संत चोखामेळा ट्रस्ट बचाव कृती समितीची होणार स्थापना

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१९ ऑक्टोबर**

शहरातील निजाम काळापासून अस्तित्वात असलेल्या नेहरू चौक नजीक संत चोखामेळा ट्रस्टची जागा आहे. या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठी बौद्ध समाजाची व्यापक अशी बैठक आज दिनांक १६ ऑक्टोंबर रोजी जिजामाता उद्यानात संपन्न झाली .या बैठकीत संत चोखामेळा ट्रस्ट बचाव कृती समिती स्थापन करण्याचे एकमताने ठरविण्यात आले. यासाठी लवकरच पुढील दिशा एक बैठक घेऊन ठरविण्यात येणार आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की, शहरातील जगमित्र नागा मंदिर, तसेच सोपान काका मंदिर, आणि संत चोखामेळा मंदिरासाठी निजामाने जमिनी दिल्या होत्या. त्यामुळे संत चोखामेळा ट्रस्ट पुढे स्थापन करण्यात येऊन सदर जमीन ट्रस्टच्या ताब्यात देण्यात आली. परंतु या जमिनीवर पुढे चहुबाजूने अनेकांनी अतिक्रमण केलेले आहे. त्यामुळे चोखामेळा यांचे अनेक कार्यक्रम सध्या बंद पडलेले आहेत.

संत चोखामेळा हे वारकरी संप्रदायातील महान असे संत होते. पंढरपूर येथील विठ्ठलाच्या दर्शनापूर्वी प्रत्येक जण संत चोखामेळा यांचे दर्शन घेत असतो. संत चोखामेळा यांनी बौद्ध विचारावर समतेचे पेरणी केलेले आहे. त्यांचे साहित्य हे परिवर्तनवादी आणि तत्कालीन समाज व्यवस्थेविरुद्ध बंड करणारे होते. महाराष्ट्रातील महान संतांच्या यादीमध्ये चोखामेळा यांचा उल्लेख करण्यात येतो. परळी येथील त्यांच्या नावे असलेल्या ट्रस्टच्या जागेवरील अतिक्रमण काढण्यासाठी जिजामाता उद्यान येथे समाजाचे आज व्यापक बैठक संपन्न झाली .या बैठकीत भव्य असे चोखामेळा भवन निर्माण करणे, जागेवरील अतिक्रमण काढणे आदींसह ट्रस्टमध्ये विश्वासतांना सोबत घेऊन आवश्यक ती कार्यवाही करणे असे ठरले. यासाठी लवकरच पुढील बैठक घेण्यात येणार आहे.या बैठकीस समाजातील सर्व ज्येष्ठ नेते, कार्यकर्ते, समाज बांधव , महिला, पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते

# सौ.के.एस.के.काकू अन्न तंत्रज्ञान आणि कृषी महाविद्यालयात जागतिक अन्न दिन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑक्टोबर**

दिनांक १६ ऑक्टोबर २०२४ रोजी सौ. के. एस. के. काकू अन्न तंत्रज्ञान आणि कृषी महाविद्यालयात जागतिक अन्न दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात कृषी आणि अन्न तंत्रज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी अन्न दिनानिमित्त त्यांची मते व्यक्त केली. अन्न दिनाचे महत्त्व, त्याची संकल्पना, त्याचे उद्देश आणि अन्न निर्मिती तसेच प्रक्रिया याबाबत मनोगत व्यक्त केले. महाविद्यालयातील प्राध्यापकांनी देखील या विशेष दिनानिमित्त त्यांचे मनोगत केले . यामध्ये प्रा.पी. जी.पोळ, डॉ. वाघमारे , प्रा. मोहसीन शेख, प्रा. तांबोळकर यांनी मनोगत व्यक्त करताना भारत हा कृषीप्रधान देश असून भारतातील सर्व जनतेला अन्न पुरेल तसेच शाश्वत उत्पादन मिळेल याची काळजी घेऊन आधुनिक काळात नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून अन्न निर्मितीवर भर द्यावा तसेच मोठमोठ्या कार्यक्रमात होत असलेले अन्न वाटोळे होऊ न देता लागेल तेवढेच अन्न ताटात घेण्याबद्दल माहिती दिली तसेच आहारातील अन्न घटकाचे प्रमाण व त्यांचे मूल्य, फास्ट फुड चे आपल्या शरीरावर होणारे दुष्परिणाम याबाबत माहिती दिली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके हे होते. अध्यक्षीय भाषणात साळुंके म्हणाले कि, आधुनिक काळात भारतच नव्हे तर इतर देशातील लोकांना विविध रोगांना सामोरे जावे लागत आहे, याचे प्रमुख कारण म्हणजे मानवी आहार. योग्य संतुलित व सात्विक आहार न घेतल्यामुळेच मानवास विविध प्रकारच्या बाधा होत असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे आपण सकस आहार घेण्यावर भर द्यावा. तसेच सेंद्रिय उत्पादित अन्नपदार्थच खावे, जेणेकरून मानवाची प्रतिकारक्षमता चांगली होऊन शरीर सुदृढ राहील. भारतीय संस्कृतीत आहार, विहार, आचार आणि विचार या चार गोष्टींना अति महत्व असून या गोष्टी योग्य असतील त संपूर्ण मानव प्रजाती ही सशक्त आणि मजबूत राहू शकेल. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रथमेश खिंवसरा आणि श्रुती वाघमारे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. मांजरे यांनी केले. यावेळी दोन्ही महाविद्यालयातील प्राध्यापक तसेच सर्व विद्यार्थी उपस्थित होते.



# माजी मंत्री क्षीरसागर यांचे सोशल मीडिया अकाऊंट हॅकचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑक्टोबर**

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचे फेसबुक पेज हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याची बाब समोर आली आहे. याबाबत क्षीरसागर यांच्या कार्यालयाकडून थेट फेसबूक मुख्यालयाकडे तक्रार केली गेली. त्यानंतर शुक्रवारी पुन्हा त्यांचे पेज सुरळीत झाले आहे. दरम्यान ऐन निवडणुकीच्या धामधुमीत त्यांचे सोशल मीडिया अकाऊंट हॅक करण्याचा प्रयत्न झाल्याने खळबळ उडाली आहे.



माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर हे सध्या कुठल्याच पक्षात नाहीत. ते विधानसभा निवडणुक लढविणार असल्याचे स्पष्ट आहे. त्यांनी यासाठी मागील काही दिवसात दौरे, भेटी, बैठका घेतल्या आहेत. अपक्ष किंवा कुठल्या पक्षात प्रवेश करून लढायचे हे अद्याप त्यांनी स्पष्ट केले नाही. मात्र त्यांनी प्रचार सुरू केलेला आहे. सोशल मीडियावरून ते सक्रीय आहेत. निवडणुकांची घोषणा झाल्यानंतर आता प्रत्यक्षात काही दिवसात अर्ज, प्रचार या बाबींना सुरूवात होणार आहे. यात सोशल मिडीयाचीही मोठी भूमिका असते.

# काकू-नाना प्रतिष्ठानचा फिरता दवाखाना ग्रामस्थांच्या आरोग्यास लाभदायी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ ऑक्टोबर**

लोकनेते माजी मंत्री जयदत्त (आण्णा) क्षीरसागर यांच्या संकल्पनेतून काकू-नाना प्रतिष्ठान, राज्यस्तरीय विशेष वैद्यकीय मदत कक्ष, तसेच आदर्श शिक्षण संस्थेचे सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय संलग्नित महात्मा गांधी रुग्णालय यांच्या समन्वयाने मोफत सामुदायिक आरोग्य शिबिर बीड तालुक्यातील चौसाळा सर्कल मधील वाढवणा येथे दिनांक १९ ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले. वाढवणा गावात आयोजित शिबिरात ग्रामस्थांमध्ये सर्दी, खोकला, ताप, सांधेदुखी, अंगदुखी यांसारख्या आजारांचे प्रमाण निदर्शनास आले.शिबीराचे वैशिष्ट्य म्हणजे तज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून मोफत सामुदायिक आरोग्य तपासणी, विनामूल्य रक्त, लघवी, ईसीजीची तपासणी, गरज भासल्यास विनामूल्य रुग्णवाहिका याबरोबरच आयुष्यमान भारत कार्ड सुविधा डॉ.मीनल गजभिये डॉ.भाग्यश्री दगडे, डॉ.प्रमोद सोनकांबळे, डॉ.प्रिया गुरखुदे यांनी ग्रामस्थांच्या आरोग्याची तपासणी केली. काकू-नाना प्रतिष्ठानचे सचिव डॉ.अरुण भस्मे, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासन अधिकारी राजा मचाले, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.महेंद्र गौशाल, उपप्राचार्य तथा कार्यक्रमाधिकारी डॉ.गणेश पांगारकर, डॉ.अंजली पवार यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ.अंजली क्षीरसागर अमृता आगवान, डॉ.विश्वजीत बोंडार, डॉ.आनंद दाभाडे, डॉ.योगेश धुमक यांच्या समन्वयातून राबवण्यात आले. याशिवास गावातील बबन साठे, बाळासाहेब मुळे, भीमराव साठे, रमेश हागारे, सुनंदा मुळे, योगेश साठे, अशोक काटे, गणेश साठे, राजेश मुळे, बब्रुवान मुळे, सचिन हागारे यांनी शिबिरासाठी विशेष सहकार्य केले.



# संपूर्ण भारत पंजाबराव देशमुखांचा लाभधारक-डॉ.राजेश मिरगे

## अट्टल महाविद्यालयात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त विशेष व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ ऑक्टोबर**

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी केवळ शिक्षणसंस्था सुरू केली नाही, तर त्यांचे सामाजिक कार्य, राजकारणाच्या माध्यमातून भारतीय संविधानाच्या निर्मिती संदर्भातील योगदान, भारतात नवीन पिकांचे वाण निर्माण करण्यामधील योगदान, भारताचा पाणी प्रश्न हा केंद्र शासनाच्या अखत्यारित असावा या संदर्भातला आग्रह तसेच आरक्षणाच्या संदर्भात मराठा आणि कुणबी एकच आहे याविषयीचा केलेला युक्तिवाद हा अतिशय महत्त्वाचा आहे. आपण फक्त शिक्षण क्षेत्रापुरते डॉ. पंजाबराव देशमुख यांना मर्यादित ठेवतो. परंतु त्यांच्या कार्याचा तो फक्त छोटासा भाग आहे. त्यांनी केलेला आंतरजातीय विवाह हा प्रेम विवाह नसून जाणीवपूर्वक जातीअंतासाठी दिलेला लढा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेच्या शेवटच्या भाषणात डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या सहकार्याची नोंद घेणे म्हणजे डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक, धार्मिक आणि जातीय स्तरावरील भान किती होते, त्याचे द्योतक आहे. केवळ विदर्भच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्र आणि भारत त्यांच्या कार्याचा लाभधारक आहे' असे मत व्याख्याते डॉ. राजेश मिरगे यांनी व्यक्त केले.' ते र. भ. अट्टल महाविद्यालयात 'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख : समाजक्रांती व भारतीय संविधानातील योगदान, या विषयावर आयोजित व्याख्यानात बोलत होते.श्री. शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचलित, श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालय, अमरावती आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ, छत्रपती संभाजीनगर संचलित, र. भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई, जि. बीड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शतकोत्तर रौप्य महोत्सवी जयंती वर्षानिमित्त 'लोकमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख : समाजक्रांती व भारतीय संविधानातील योगदान, या विषयावर विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे या होत्या. अमरावती येथील श्री. शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयाचे मराठी विषयाचे प्राध्यापक तथा प्रसिद्ध वक्ते प्रा. डॉ. राजेश मिरगे यांनी मार्गदर्शन केले. तर श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विनय राऊत यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. समाधान इंगळे यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले. याप्रसंगी उपप्राचार्य मेजर विजय सांगळे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. प्रवीण सोनुने, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. अरुण जाधव, डॉ. भारत पगारे, डॉ. संदीप वंजारी, डॉ. रेवणनाथ काळे, डॉ. देव रिठे, डॉ. सुदर्शना बढे, डॉ . हनमंत हेळंबे, प्रा. सतीश जाधव, डॉ. प्रदीप दहिंडे, प्रा. स्वाती कुलकर्णी, प्रा. आदिती जाधव, प्रा. उदय डोंगरे, प्रा. यादव, प्रा. लगड, प्रा. नितीन क्षीरसागर, प्रा. दौलत मंचरे, डॉ. शिंगाडे, यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थिती होते. सुदर्शन निकम आणि प्रतिक सदाफुले यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी मतदार जागृतीची शपथ घेतली.



# काकडहीरा ग्रामस्थांकडून भगवानगड माऊली मंदीरासाठी ६५ लाख देणगी

**तभा वृत्तसेवा**
**पाटोदा दि.१९ ऑक्टोबर**

तालुक्यातील मौजे काकडहिरा गाव आणि भगवान गडाचे खुप जुणे ऋणानुबंध आहेत. या ऋणानुबंधातूनच ग्रामस्थांनी महंत नामेदवशास्त्री यांना गावात बोलावून भगवान गडावरील माऊली मंदीरासाठी ६५ लक्ष रूपयांची देणगी जाहीर केली. यावेळी शास्त्रीजी यांचे ग्रामस्थांच्या वतीने अभुतपुर्व असे स्वागत केले.



विसाव्या शतकातील थोर संत भगवान बाबा आणि पाटोदा तालुक्यातील मौजे काकडहीरा येथील ग्रामस्थ भाविकांचे खुप ऋणानुबंध होते. यामुळे आजही काकडहिरा हे भगवानगडाचे मानाचे गाव आहे. भगवानगडाच्या कीर्तनात चालीचा मान काकडहिरा गावाला आहे. कारण भगवान बाबांनी जेव्हा पंढरपूरची दिंडी सुरू केली तेव्हा दिंडीत सर्वाधिक भाविक काकडहिरा गावचे असायचे. यामुळे भगवान बाबांनी चालीचा मान काकडहिरा गावाला दिलेला आहे. गावातील परंपरेच्या अखंड हरिनाम सप्ताहात भगवान गडाचे महंत शास्त्री महाराज यांना ग्रामस्थाने बोलावून त्यांची भव्य दिव्य रथातून मिरवणूक काढली होती. त्यावेळी आठ जेसीबीच्या माध्यमातून महाराजांवर पुष्पवृष्टी करण्यात आली. २०० किलो वजनाचा हारा क्रेनच्या सहाय्याने शास्त्री महाराजांना घालण्यात आला. गावात त्यांच्या स्वागतासाठी पुण्यावरून ढोल पथक मागविण्यात आले. सध्या क्षेत्र भगवान गड येथे ऐतिहासिक आणि भव्य असे संत ज्ञानेश्वर माऊलींचे मंदिर बांधले जात आहे. या मंदिरासाठी मौजे काकडहिरा ग्रामस्थांनी ६५ लाख रुपये देणगी देण्याचा संकल्प गडाचे महंत शास्त्री बाबा यांच्या उपस्थितीत जाहीर केला. लहान- थोर अशी सर्वांची मदत-पाटोदा तालुक्यातील मौजे काकडहिरा गावामध्ये ऊसतोड कामगार, नोकरदार, शेतकरी, शेतमजूर वास्तव्यास आहेत. गावातील प्रत्येक वर्गातील लहान-थोरांनी आपापल्या कुवतीनुसार भगवानगडाच्या माऊली मंदिरासाठी मदत जाहीर केली. माऊलींच्या मंदीरासाठी माझाही एक दगड या भावनेतून सर्वांनी सढळ हाताने देणगी जाहीर करून ६५ लाख रुपये देण्याचे जाहीर केले.

# परळी व माजलगाव विधानसभा मतदारसंघ माकप लढविणार-कॉ.पी.एस घाडगे

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१९ ऑक्टोबर**

विद्यार्थी, युवक, शेतकरी व कष्टकरी कामगारांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी माकप परळी वै व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन निवडणुक लढविणार आहे. सत्ताधारी व विरोधक जनतेच्या प्रश्नां ऐवजी भावनिक प्रश्न पुढे करीत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील दोन्ही मतदारसंघांत माकप निवडणुक लढविणार असल्याची माहिती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे राज्य कमिटी सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी दिली आहे.




केंद्रात व राज्यात सत्तेत असलेल्या सरकारने शेतकरी, शेतमजुरांच्या प्रश्नाची सोडवणुक करण्या ऐवजी प्रश्न वाढले आहेत. युवकांच्या हाताला काम नाही. मतदारांमध्ये विद्यमान सरकार विषयी चिड निर्माण झालेली आहे. राज्यात धर्म व जातीयवादावर निवडणुक लढविली जात आहे. जनतेच्या प्रश्नांना जाणीवपूर्वक दुर्लक्षीत केले जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ व माजलगाव विधानसभा मतदारसंघातुन मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष निवडणुक लढविणार आहे. भाजपच्या सरकार चा पराभव करण्यासाठी महाविकास आघाडी सोबत माकप सामंजस्याची भुमिका घेत आहे. माकप बीड जिल्हा समिती ने राज्य समिती कडे दोन्ही मतदारसंघांत निवडणूक लढविण्याची तयारी दर्शवली आहे. माकप राज्य समिती ने महाविकास आघाडी कडे दोन्ही मतदारसंघ मिळावे अशी आग्रही मागणी केली आहे. बीड जिल्ह्यात माकपने शेतकरी, कष्टकरी, असंघटित क्षेत्रातील कामगार व विद्यार्थी-युवकांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. तसेच शोषित, वंचित व महिलांच्या प्रश्नावर सातत्याने आंदोलने केली आहेत. दोन्ही मतदारसंघांत माकप ची संघटनात्मक बांधणी आहे. समाजातल्या वेगवेगळ्या स्तरांमध्ये पक्षाला मानणारे व चळवळीत काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची फळी आहे. २०१८ पासुन केलेल्या आंदोलनामुळे कोट्यवधी रुपयांचा पिक विमा लाखो शेतकऱ्यांना मिळाला आहे. त्यासह असंघटीत क्षेत्रातील कामगांराना न्याय मिळवून देण्यात आला आहे. त्यामुळे परळी वैजनाथ व माजलगाव मतदारसंघ महाविकास आघाडी ने माकप साठी सोडावा अशी मागणी करण्यात आलेली आहे. दोन्ही मतदारसंघांत माकप ताकतीने निवडणुका लढविणार असल्याचे माकपचे राज्य समिती सदस्य कॉ पी एस घाडगे यांनी व्यक्त केला आहे.

# माहेश्वरी सभेकडून हजारो रुग्णांना मोफत दम्याचे औषध वाटप

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१९ ऑक्टोबर**

प्रतिवर्षी प्रमाणे यावर्षी ही दि १६रोजी शहरतील राजस्थानी मंगल कार्यालय येथे प्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कंलंत्री यांच्या दमा औषधीचे सुमारे १५०० रुग्णांना मोफत वाटप माहेश्वरी सभेच्या वतीने तालुकाध्यक्ष उमेशकुमार जेथलिया व सर्व समाज बांधव यानी यशस्वी रित्या केले.



तेलगाव येथील सुप्रसिद्ध आयुर्वेदचार्य स्व चंदूलालजी कलत्री यांचे दमा या आजारवरील औषधचे वाटप मागील १८ वर्षांपासून माजलगाव तालुका माहेश्वरी सभेच्या वतीने कोजागिरी पौर्णिमेच्या दिवशी करण्यात येते यावर्षी कोजागिरी पौर्णिमे १५ ऑक्टोबर बुधवार रोजी शहरातील राजस्थानी मंगल कार्यालय येथे रात्री १२वाजता कोजागिरीच्या दुधासोबत सुमारे १५०० लोकांनी लाभ घेतला.

यावेळी व्यासपीठावर तालुकाध्यक्ष उमेश जेथलिया माजी जिल्हाध्यक्ष जयप्रकाश कंलंत्री, डॉ सुरेंद्र कंलंत्री, श्रीनिवास बाहेती, राधेश्याम लोहिया, गोविंद बजाज,राजेंद्र इंदानी संतोषबापू जेथलिया, तालुका सचिव गोपाल मानधने उपस्थित होते. यावेळी संतोषबापू जेथलिया यांनी समाज प्रबोधनपर व्याख्यान दिले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद जाजू तरं आभार नवल किशोर काबरा यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजलगाव माहेश्वरी सभेच्या शेकडो कार्यकर्त्यांनी परिश्रम केले.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# परतीच्या पावसाची जोरदार बॅटिंग, मका कणसाना फुटले कोंब, कापसाचे नुकसान

## दिवाळी अगोदरच शेतकरी सापडला आर्थिक संकटात





तभा वृत्तसेवा

नाचनवेल: दि.१९. ऑक्टोंबर- कन्नड तालुक्याला शुक्रवारी दिनांक १८ रोजी रात्री परतीच्या पावसाने झोपून काढले. यात नाचनवेल, चिंचोली मंडळात अतिवृष्टी झाली, नाचनवेल मंडळात ४५ मि. मी पाऊस झाला. तालुक्यात सलग पाच-सहा दिवसापासून पाऊस झाला यात कापलेली मक्का, चारा ,कापूस भिजले असून वेचणीला आलेल्या कापसाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून कपाशीच्या कैऱ्याना देखील सड लागत आहे त्यात मजूर मिळत नाही, तोडलेल्या मकाच्या कणसाना देखील कोंब फुटले आहे, तर गुरांच्या चाऱ्याचे देखील नुकसान झाले आहे, हाता तोंडाशी आलेल्या मक्का ,कापूस पिकांचे परतीच्या पावसाने नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे, तर शेतकरी हवालदील झाला आहे.हवामान खात्याने वर्तवलेल्या अंदाजाप्रमाणे तालुक्यात ठिकठिकाणी मेघगर्जनासह पावसाने हजेरी लावली आहे . ग्रामीण भागात सध्या कापूस वेचणी मका कापणी अशा कामांना ब्रेक लागला आहे. परतीच्या पावसामुळे पशुधन पालकांची तारांबळ उडत असून विशेषता दूध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांना मोठी कसरत करावी लागत आहे. पावसामुळे रब्बी हंगाम चांगला येणार असला तरी खरिपाचा घास मात्र हिरावण्याची भीती व्यक्त केली जात आहे. परिस्थिती दिसत आहे.

# महिलांचा मतदानात सहभाग वाढविण्यासाठी जनजागृती करण्याचे आवाहन

## मुख्य निवडणूक अधिकारी सुचित्रा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न

तभा वृत्तसेवा.

गंगापूर दि.१९ ऑक्टोबर.

१११ गंगापूर विधान सभा सार्वत्रिक निवडणूक ची बैठक मुख्य निवडणूक अधिकारी श्रीमती सुचित्रा शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली, नवीन प्रशासकीय इमारत येथे (दि.१८) झालेल्या बैठकीला गंगापूर तहसीलदार नवनाथ वगवाड, खुलताबाद तहसीलदार स्वरूप कंकाळ , नायब तहसीलदार गौरव खैरनार, सचिन वाघमारे उपस्थित होते.



बैठकी साठी, गंगापूर खुलताबाद अंतर्गरत कार्यरत सर्व सेक्टर ऑफिसर, झोनल अधिकारी व मतदान केंद्र अधिकारी बि एल ओ हजर होते. सदर बैठक दोन सत्रात घेण्यात आली या बैठकीत मुख्य निवडणूक अधिकारी यांनी दिव्यांग मतदार, वयस्कर मतदार,महिला मतदान केंद्र,होम वोटिंग,तसेच मतदार जनजागृती आदी विषयांवर उपस्थितांना माहिती दिली.वृद्ध आणि दिव्यांग व्यक्तिंना घरबसल्या मतदानाची सुविधा .८५ वर्षावरील मतदार व ४०% अपंगत्व असलेले दिव्यांग व्यक्ती गृह मतदान पर्यायाचा लाभ घेऊ शकतात महिलांचा मतदानात सहभाग वाढावा म्हणून महिला करिता एका स्वतंत्र विशेष मतदान केंद्राची व्यवस्था करण्या बाबत सांगितले

सदर बैठकीत मतदान जनजागृती बाबत जास्तीत जास्त जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले. या

कामासाठी दि २२ ऑक्टोबर व दि. २३ ऑक्टोबर राजी बिएलो लाभार्थ्यांना त्यांच्या घरी भेटी देणार आहेत.

## भगवान ऋषभदेव आयोध्या तीर्थप्रभावना रथाचा शुभारंभ २१ ऑक्टोबर पासून

छत्रपती.संभाजीनगर : जैन धर्म अनादी कालापासून असून जैन शास्त्राप्रमाणे तीर्थंकरचा जन्म आयोध्या येथेच होतो व त्यांना मोक्ष सम्मेदशिखरजी पासून प्राप्त होतो परंतु या हुंडावसर्पणी काल मध्ये पाच तीर्थन्करांनी आयोध्येमध्ये जन्म घेतला आहे प्रथम तीर्थन्कर भगवान ऋषभदेवाने करोडो-करोडो वर्षांपूर्वी आयोध्येमध्ये जन्म घेतला आहे. त्यानंतर द्वितीय तीर्थन्कर भगवान अजितनाथ, चतुर्थ तीर्थन्कर भगवान अभिनंदननाथ, पंचम तीर्थन्कर भगवान सुमतिनाथ, चौदावे तीर्थन्कर भगवान अनंतनाथ यांनी आयोध्या मध्ये जन्म घेतला आहे. याच आयोध्येमध्ये मर्यादा पुरुषोत्तम भगवान श्रीराम यांनी जवळपास ९ लाख वर्षांपूर्वी जन्म घेतला.

# विधानसभा निवडणूक पूर्वपीठिकेचे मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते प्रकाशन

## माध्यमांना निवडणूक विषयक संदर्भासाठी पुस्तिका उपयुक्त- मुख्य सचिव

शिर्डी, दि. १९ :-* विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने आहिल्यानगर जिल्हा निवडणूक प्रशासनाच्यावतीने तयार करण्यात आलेल्या निवडणूक पूर्वपीठिकेचे प्रकाशन राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या हस्ते शिर्डी येथे करण्यात आले. माध्यम प्रतिनिधींना निवडणूक विषयक संदर्भासाठी पुस्तिका उपयुक्त असल्याचे श्रीमती सौनिक यावेळी म्हणाल्या.



याप्रसंगी महारेराचे अध्यक्ष मनोज सौनिक, सेवानिवृत्त पोलीस महासंचालक दत्तात्रय पडसलगीकर, विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, अपर जिल्हाधिकारी बाळासाहेब कोळेकर, शिर्डी उपविभागीय पोलीस अधिकारी माणिक आहेर आदी उपस्थित होते.

आहिल्यानगर जिल्हा माहिती कार्यालयाने माध्यम प्रतिनिधींच्या सुलभ संदर्भासाठी या पुस्तिकेची निर्मिती केली आहे. निवडणूक आचारसंहितेबाबत तरतुदी, निवडणूक वार्तांकनासाठी प्रेस कौन्सिलची मार्गदर्शक तत्त्वे, न्यूज ब्रॉडकास्टर्स अँड डिजिटल स्टँडर्डस् ऑथॉरिटीच्या (एनबीडीएसए) मार्गदर्शक सूचना, इंटरनेट अँड मोबाईल असोसिएशन ऑफ इंडियाची (आयएमएआय) स्वैच्छिक आचारसंहिता आदींबाबत सविस्तर माहिती या पुस्तिकेत दिली आहे.

राजकीय जाहिरातींच्या प्रमाणीकरणासाठी माध्यम प्रमाणीकरण आणि संनियंत्रण समितीचे कामकाज (एमसीएमसी), पेड न्यूजबाबत तरतुदी आदी उपयुक्त माहितीही या पुस्तिकेत आहे.

सन १९५१ च्या निवडणुकीपासून २०१९ च्या निवडणुकीपर्यंत जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघातील उमेदवार त्यांना झालेले मतदान, मतदार संख्या, वैध मतांची संख्या, मतदानाची टक्केवारी यांचाही पुस्तिकेत समावेश असल्याने ही पुस्तिका माध्यम प्रतिनिधींना संदर्भासाठी उपयुक्त आहे.

माध्यमांच्या माहितीसाठी जिल्ह्यातील बारा विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, निवडणुकीच्या अनुषंगाने विविध विषयांचे समन्वय अधिकारी यांचे दूरध्वनी क्रमांक, मतदार मदत कक्ष, जिल्हास्तरीय नियंत्रण कक्ष यांचे दूरध्वनी क्रमांक, आयोगाच्या विविध तंत्रज्ञान सहाय्यित उपयोजक (प), पोर्टल आदींची माहितीही यात देण्यात आली आहे.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र. ४५८/२०२४

पु.ता.२८/११/२०२४.

अर्जदार : १) पुष्पा एकनाथ जाधव, वय ६३ वर्षे, धंदा घरकाम रा. शहापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) गणेश एकनाथ जाधव, वय ३९ वर्षे, धंदा नौकरी रा. शहापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) ज्योती भ्र. प्रदिप गायकवाड वय ४४ वर्षे धंदा घरकाम रा. माका ता. नेवासा जि. अहमदनगर ४) गिता भ्र. गणेश डोखळे, दय ४२ वर्षे, धंदा घरकाम रा. शिक्षक कॉलनी, गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ५) सविता भ्र. प्रशांत जमदाडे वय ३५ वर्षे, धंदा घरकाम रा. राशिन ता. कर्जत जि. अहमदनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण - हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. के. आर. कन्हाळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.२ ते ५ ह्या आपसात नात्याने सख्खे बहिण व भाऊ असुन अर्जदार क्र.१ ही त्यांची आई आहे. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ ते ५ यांचे वडील नामे एकनाथ विश्वनाथ जाधव हे मौजे शहापुर ता. गंगापुर येथील रहिवाशी होते ते दिनांक २३/०२/२०२४ रोजी मौजे शहापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेले आहे. मयत एकनाथ विश्वनाथ जाधव यांना अर्जदार क्र.१ ते ५ हे कायदेशीर वारसदार असुन त्यांच्या व्यतिरीक्त मयत एकनाथ विश्वनाथ जाधव यांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणपत्र मिळणे कामी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्‌द्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.**

दिवाणी कि. अर्ज क्र.१५८/२०२४

अर्जदार : १) रहीम रशीद शेख वय-७० वर्ष धंदा-शेती २) खलील रशीद शेख, वय-६८ वर्ष धंदा- शेती ३) नईम मजीद शेख वय-४८वर्ष धंदा-शेती ४) शरीफ मजीद शेख वय-४६ वर्ष धंदा-शेती ५) आरिफ मजीद शेख वय-४४-वर्ष धंदा-शेती ६) अशपाक मजीद शेख वय-४२-वर्ष धंदा-शेती सर्व रा. किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद.

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरणः- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र. १ व २ यांचे भाउ व अर्जदार क्र. ३ ते ६ यांचे काका शेख सलीम शेख रशीद यांचा दिनांक-२८/०१/२०१६ रोजी मौजे किन्ही ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे शेख सलीम शेख रशीद यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख २५/११/२०२४. आज दि. १८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक, अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

मा. दिवाणी न्यायाधीश, क स्तर सोयगाव यांचे न्यायालय जि. औरंगाबाद.

दिवाणी कि. अर्ज क्र १३९/२०२४

अर्जदारः १) कुसुमबाई जुलाल सोनवणे, वय-६५वर्ष धंदा-घरकाम २) वेडू जुलाल सोनवणे, वय-३१ वर्ष धंदा शेती ३) इंदुबाई अशोक खैरनार वय-३८ वर्ष धंदा- घरकाम १ ते ३ रा. निंभोरा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. ४) सुरेखाबाई सुभाष शिरसाठ, वय-४० वर्ष धंदा- घरकाम रा. गोंदेगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद. ५) कमल जगन्नाथ वाघ वय-३६ वर्ष धंदा-घरकाम रा. दाभाडी, ता. मालेगाव, जि. नाशिक. ६) विमलबाई भाऊसाहेब कोळी वय-३४ वर्ष धंदा घरकाम रा.खेडी, पो. खेडगाव, ता. चाळीसगाव, जि. जळगाव

-: विरुध्द :-

गैरअर्जदार : कोणीही नाही

प्रकरण:- वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत.

सर्व संबंधितास या जाहीर प्रगटणाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी ॲड.एस.पी. सुर्यवंशी, सोयगाव, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज केलेला आहे. अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील कै. जुलाल शामा सोनवणे यांचा दिनांक ०४/०७/२०२४ रोजी वृद्धपकाळाणे मौजे निंभोरा, ता. सोयगाव, जि. औरंगाबाद येथे राहत्या घरी मृत्यु झालेला असून त्याच्या पश्चात वरील अर्जदार क्र. १ ते ६ हे वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात वकीलामार्फत दाखल आहे. अर्जदार क्र. १ ते ६ हे मयत कै. जुलाल शामा सोनवणे यांचे एकमेव वारस असून त्यांना शासकीय व निमशासकीय लाभासाठी वारस प्रमाण पत्राची आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाचा अर्जदार क्र. १ ते ६ यांना वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदार क्र. १ ते ६ यांना कायदेशीररित्या योग्य ते वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. पुढील तारीख ०८/११/२०२४. आज दि. १८/१०/२०२४ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले.

आदेशावरुन

विभागीय लिपीक — सहाय्यक, अधीक्षक

दिवाणी न्यायालय क स्तर सोयगांव

## जाहीर प्रगटन

**मा. व्ही. एन. काटकर मॅडम, दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांच्या न्यायालयात.**

दि.कि.अर्ज क्र. २९६/२०२४

अर्जदार : १) पार्वताबाई कारभारी पाखरे, वय ८३ वर्षे, धंदा- काही नाही, २) रा. शिवराई, ता. कन्नड जि. औरंगाबाद श्रीराम कारभारी पाखरे वय ५७ वर्षे, धंदा- नौकरी, रा. शिवराई, ता. कन्नड जि. औरंगाबाद ३) रंजनाबाई बारकु सोनवणे, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. निंभोरा, ता. कन्नड जि. औरंगाबाद ४) चंद्रकलाबाई संतोष घुगे, वय ४५ वर्षे, धंदा घरकाम, रा. वासडी ता. कन्नड जि. औरंगाबाद ५) रुखमनबाई रामनाथ कुटे, वय ५१ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरोरा, ता. जि. औरंगाबाद ६) मंदा सर्जेराव सोनवणे, वय ४२ वर्षे, धंदा- घरकाम, रा. निंभोरा, ता. कन्नड जि. औरंगाबाद

विरुध्द

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

अर्ज :- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी त्याचे विधीज्ञ यु. ए. वारे यांचे मार्फत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे कायमचे राहणारे असुन अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ ते ६ यांची आई आहे. तसेच अर्जदार क्र. २ ते ६ हे सख्खे बहीन-भाऊ आहे. अर्जदार क्र. १ यांचे पती व अर्जदार क्र. २ ते ६ यांचे वडील कारभारी छगन पाखरे हे होते ते दिनांक ०९/०७/२०२१ रोजी मौजे शिवराई ता. कन्नड येथे मयत झालेले असुन त्यांचा अंत्यविधी शिवराई येथेच झालेला आहे. सोबत मृत्यु प्रमाणपत्र जोडत आहे. अर्जदार यांना शासकिय तसेच निमशासकिय कार्यालयात देण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. तसेच महसुल दप्तरी वारसाचे नोंद करण्यासाठी, तसेच तहसिल कार्यालयात, ग्रा.पंचायत कार्यालयात, पंचायत समिती कार्यालयात वारस असल्याचे नोंद करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील अधिकाऱ्यांनी न्यायालयाचे वारस प्रमाणपत्र घेवुन येणे असे सांगीतल्यावरुन सदरील अर्जास कारण घडले आहे.

त्याअर्थी सदरील जाहीर प्रगटनव्दारे सर्व जनतेस सुचीत करण्यात येते की, सदरील प्रकरणाबाबत कोणाचाही काही उजर, अक्षेप अथवा वारस प्रमाणपत्र अर्जदाराला देण्याचा कोणाचीही काही हरकत असल्यास सदरील जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत स्वतः अगर आपले विधीज्ञामार्फत हजर होवुन उजर, आक्षेप नोंदवावा व मुदतीत उजर, आक्षेप न आल्यास अर्जदाराच्या हक्कात वारसाचे प्रमाणपत्र देण्याचे आदेश देण्यात येईल याची नोंद घ्यावी. सबब हे जाहीर पगटन.

दिनांक १५/१०/२०२४

आदेशावरून

सहाय्यक अधिक्षक कन्नड

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हिल एम.ए. क्र. ४६९/२०२४

अर्जदार : १) मिलींद जगन्नाथ वंजारे, वय ५५ वर्षे धंदा मजुरी, २) आप्पासाहेब जगन्नाथ वंजारे, वय ३९ वर्षे धंदा मजुरी दोघे रा. देवळी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) सौ. आशाबाई दिपक गायकवाड वय ५८ वर्षे, धंदा घरकाम, रा. पडेगाव ता. जि. छत्रपती संभाजीनगर ४) पुष्पा सुरेश गायकवाड वय ३७ वर्षे धंदा घरकाम, रा. गोळेगाव ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक

प्रकरण - बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार क्र. १ ते ३ यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. के. आर. कन्हाळे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ते ४ हे आपसांत नात्याने सख्खे बहिण व भाऊ असुन ते वरील नमुद पत्यावरील कायमचे रहिवाशी आहेत. अर्जदारांचे वडीलांचे सख्खे चुलते नामे हिरामन सुकाजी वंजारे हे दिनांक २४/०४/२००३ रोजी मौजे देवळी ता. गंगापुर जि. औरंगाबाद येथे मयत झालेले असुन अर्जदारांच्या वडीलांची सख्खी चुलती नामे राधाबाई हिरामन वंजारे ह्या दिनांक २७/११/२०११ रोजी मयत झालेल्या आहे. मयत हिरामन व मयत राधाबाई हे निपुत्रीक होते व त्यांचे हयातीपर्यंत दोन्ही मयतांना कोणतेही अपत्ये नव्हती. दोन्ही मयतांचा सांभाळ व देखभाल ही अर्जदारांचे वडील नामे जगन्नाथ भागिनाथ वंजारे व त्यांची पत्नी नामे वत्सलाबाई जगन्नाथ वंजारे यांनी सख्खा पुतण्या व सुन या नात्याने केलेला असुन जगन्नाथ भागीनाथ वंजारे हे मयत हिरामन सुखाजी वंजारे व मयत राधाबाई हिरामन वंजारे यांचे कायदेशीर वारसदार होते. जगन्नाथ भागीनाथ वंजारे हे दिनांक ०८/०२/२००५ रोजी मयत झाले असुन मयत जगन्नाथ यांची पत्नी नामे वत्सलाबाई जगन्नाथ वंजारे या दिनांक २०/०९/२०२४ रोजी मयत झालेल्या आहे, मयत जगन्नाथ भागिनाथ वंजारे व मयत वत्सलाबाई जगन्नाथ वंजारे यांना अर्जदार क्र. १ ते ४ हे कायदेशीर वारसदार आहे. येणे प्रमाणे मयत हिरामन सुकाजी वंजारे व मयत राधाबाई हिरामन वंजारे यांचे अर्जदार क्र.१ ते ४ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरीक्त मयतांना इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन वारसप्रमाणपत्र मिळणे कामी या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्‌द्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/१०/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्री.व्ही. डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधीश' क' स्तर साहेब कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए. २४८/२०२४

पु.ता. २०/११/२०२४

अर्जदार :- १) गणेश तुकाराम रिन्ढे, वयः ४१ वर्ष धंदाः शेती, रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) देविदास तुकाराम रिन्ढे, वयः ५५ वर्ष धंदाः शेती, रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ३) तुकाराम यशवंता रिन्ढे, वयः ७८ वर्ष धंदाः शेती, रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ४) रुखमनबाई अप्पासाहेब नरोडे वयः ५४ वर्ष धंदाः घरकाम, रा वसू सायगाव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ५) सुनिता बाबासाहेब बोरसे, वयः ५२ वर्ष धंदाः घरकाम, रा शिरोडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय :- वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरर्शिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार ही वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत आई १ पत्नी नामे कै. जिजाबाई तुकाराम रिन्ढे असून त्यांचा मृत्यू दिनांक १२/०७/२०२४ रोजी जेहुर तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत देवगाव रंगारी तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. असे की सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ व २ हा मयत यांचा मुले असून, अर्जदार क्रमांक ३ मयत यांची पत्नी असून, अर्जदार क्रमांक ४ व ५ मयत यांच्या मुली आहे. असे की, सदरील अर्जदाराशिवाय मयत आई / पत्नी नामे कै. जिजाबाई तुकाराम रिन्ढे यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा जेहुर, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी/ ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले. सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक ०५/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक — सहायक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड)

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्री. व्ही.डी.पाटील साहेब, दिवाणी न्यायाधीश 'क' स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए. २७०/२०२४ पुढील तारीख २७/११/२०२४ अर्जदार :- १) रावसाहेब दत्तू दापके, वयः ४५ वर्ष, धंदाः शेती, रा चांभारवाडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) विठ्ठल दत्तू दापके, वयः ४० वर्ष धंदाः शेती, रा चांभारवाडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ३) शकुंतलाबाई दत्तू दापके, वयः ६५ वर्ष, धंदाः शेती रा चांभारवाडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), ४) गीता सोमीनाथ फाळके, वयः ३८ वर्ष, धंदाः शेती, रा गवळीशिवरा, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार :- महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय :- वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरर्शिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत वडील नामे कै. दत्तू सोनाबा दापके असून त्यांचा मृत्यू दिनांक ३०/०१/२०१४ रोजी चांभारवाडी, तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत चांभारवाडी, तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. असे की सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ व २ हे मयत यांचे मुले असून, अर्जदार क्रमांक ३ मयत यांची पत्नी असून अर्जदार क्रमांक ४ मयत यांची मुलगी आहे. असे की, सदरील अर्जदाराशिवाय मयत वडील नामे कै. दत्तू सोनाबा दापके यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा चांभारवाडी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी / ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले. सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर

प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक १४/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक — सहायक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड)

## जाहीर प्रगटन

**विद्यमान श्री. व्ही.डी. पाटील साहेब, दिवाणी न्यायाधीश' क' स्तर, कन्नड, यांचे न्यायालयात**

सी.एम.ए. २८६/२०२४

पुढील तारीख २०/११/२०२४

अर्जदार : १) भागिनाथ यादव गायकवाड, वयः ४६ वर्ष, धंदाः शेती, रा देवळी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), २) छबुबाई यादवराव गायकवाड, वयः ७७ वर्ष धंदाः काही नाही, रा देवळी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर) ३) मनकरना आनंदा शिंदे, वयः ५५ वर्ष, धंदाः शेती, रा वाकला रोड, जातेगाव, तालुका नांदगाव, जिल्हा नाशिक, ४) कैलास यादवराव गायकवाड, वयः ६२ वर्ष, धंदाः शेती, रा देवळी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर), ५) निर्मलाबाई विनायक पिंगट, वयः ६० वर्ष, धंदाः शेती, रा मांडकी, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर) ६) निर्मला विश्वनाथ जानराव, वयः ५१ वर्ष धंदाः शेती, रा खंडाळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद. (छत्रपती संभाजीनगर)

विरुद्ध

गैरअर्जदार - महाराष्ट्र शासन तर्फे जिल्हाधिकारी कार्यालय औरंगाबाद

विषय : वारस हक्क प्रमाणपत्र (लीगल हेअरर्शिप सर्टिफिकेट) मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने त्याचे वकील श्री संदीप ए शिरसे यांचेमार्फत या न्यायालयात अर्जदार वरील ठिकाणचे रहिवासी असून अर्जदारांचे मयत वडील / पती नामे कै. यादव गोविंद गायकवाड असून त्यांचा मृत्यू दिनांक १८/०५/२०२४ रोजी देवळी तालुका कन्नड जिल्हा औरंगाबाद येथे मयत झालेल्या आहे ग्रामपंचायत देवगाव रंगारी/देवळी तालुका कन्नड येथील मृत्यू प्रमाणपत्र दाखल करत आहे. असे की सदरील प्रकरणात अर्जदार क्रमांक १ व ४ हे मयत यांची मुलगा (मुले) असून, अर्जदार क्रमांक २ मयत यांची पत्नी असून, अर्जदार क्रमांक ३,५,६ ह्या मयत यांची मुलगी (मुली) आहे. असे की, सदरील अर्जदाराशिवाय मयत वडील / पती नामे कै. यादव गोविंद गायकवाड यांना इतर कोणीही वारस नाही तसेच रा देवगाव (रंगारी) / देवळी, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद येथे शैक्षणिक अथवा सरकारी कार्यालय (तलाठी / ग्रामपंचायत, तहसील इत्यादी.) यासाठी अर्जदार यांना सक्षम न्यायालयाचे वारस प्रमाणपत्राची मागणी केले आहे. सबब अर्ज दाखल करण्यास कारण घडले.

सबब या जाहीर प्रकटना द्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर प्रकरणाबाबत कुणाचाही काही उजर आक्षेप असल्यास त्यांनी सदरचे जाहीर प्रकटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आत स्वतः किंवा आपल्या विधिज्ञा मार्फत मा. न्यायालयात आक्षेप सादर करावा मुदतीत आक्षेप न आल्यास वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात येईल.

दिनांक १४/१०/२०२४

आदेशावरून

क. लिपिक — सहायक अधीक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर कन्नड)

# जिल्ह्यातील तीनही विधानसभा मतदारसंघात निवडणुकीसाठी कंबर कसली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ आक्टोबर**



जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी आणि वसमत विधानसभा मतदारसंघातील महायुती आणि महाविकास आघाडीतील इच्छुकांनी विधानसभा निवडणुकीसाठी कंबर कसली आहे. गावोगावी प्रचार दौरे काढून मतदारांच्या भेटीगाठी सुरू करण्यात आल्या आहेत. येत्या दोन ते तीन दिवसात कोणाला उमेदवारी मिळणार याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. त्यानिमित्त इच्छुक मोर्चेबांधणी करतांना दिसत आहेत. हिंगोली विधानसभा मतदारसंघात भाजपचे विद्यमान आ. तान्हाजीराव मुटकुळे, लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर, माजी आ. गजाननराव घुगे, माजी आ. रामराव वडकुते, माजी खा. ॲड शिवाजीराव माने हे भाजपकडून निवडणुक लढविण्यासाठी इच्छुक आहेत.

विद्यमान आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी हिंगोली विधानसभा मतदारसंघात कोट्यावधींचा निधी आणून रस्तेसह मुलभूत सुविधा दिल्या आहेत. हिंगोली शहरात नगर पालिकेच्या माध्यमातून कोट्यावधीचा निधी आणून शहरातील जुन्या शहरासह नवीन वसाहतीमध्ये सिमेंट रस्ते निर्माण केले आहेत. हिंगोली शहराचा चेहरामोहरा बदलण्याचे काम आ. मुटकुळे यांच्या माध्यमातून झाले आहे. तसेच ग्रामीण भागात मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, पंतप्रधान ग्राम सडक योजनांच्या माध्यमातून रस्त्यांची कामे पूर्ण करीत महामार्गाला जोडण्यचे काम केले आहे. याशिवाय सिंचनासाठी बंधाऱ्यांची कामे देखील आ. मुटकुळे यांच्या प्रयत्नाने झाली आहेत. ग्रामीण भागात शेतीला सुरळीत वीज पुरवठा व्हावा यासाठी मोठ्या प्रमाणात कामे केली आहेत. याशिवाय मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना, महिला सक्षमीकरणासाठी विविध योजनांची अंमलबजावणी, शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ मिळवून देण्याचे काम महायुती सरकारच्या माध्यमातून होत आहे. दुष्काळी अनुदान, पीकविमा, राज्य आणि केंद्रांकडून मिळून दरवर्षी १२ हजार रूपये शेतकरी सन्मान निधीच्या माध्यमातून दिले जात आहेत. शहर आणि ग्रामीण भागात गोरगरीबांना घरकुल योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळाला आहे. युवक-युवतींना महायुती सरकारने ८ हजार ते १० हजार रूपये महिना देत त्यांच्या हाताला काम देण्याचे काम योजनेतून केले आहे. विशेष म्हणजे या सर्व योजनांचा लाभ सर्व जातीधर्माच्या लोकांना मिळत असून त्यांच्या खात्यावर योजनेचा पैसा थेट जमा होत असल्यामुळे दलालांपासून लाभार्थ्यांना मुक्ती मिळाली आहे.

लोकसभा प्रभारी रामदास पाटील सुमठाणकर यांनी हिंगोली मुख्याधिकारी पदावर असतांना हिंगोली शहराचा विकास करण्यासाठी विविध महत्वाकांक्षी योजना राबवल्या. त्यानंतर भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर पक्षाची ध्येयधोरणे आणि योजना सर्वसामान्यापर्यंत पोहचविण्यासाठी सतत प्रयत्न केले आहेत. भाजपमध्ये रामदास पाटील यांनी कमी कालावधीत आपली छाप उमटवली असून स्वच्छ राजकारणाच्या माध्यमातून समाजकारण करीत आहेत. त्यामुळे पक्षातील वरिष्ठ नेत्यांपासून ते सर्वसामान्य कार्यकर्त्यांपर्यंत पाटील यांचे समर्थक हिंगोली लोकसभा तसेच विधानसभेत मोठ्या संख्येने तयार झाले आहेत. शिवाय ओबीसीचा मोठा चेहरा आणि स्वच्छ प्रतिमा असलेले नेतृत्व म्हणून रामदास पाटील सुमठाणकर यांचेकडे पाहीले जात आहे. लोकसभा निवडणुकीत त्यांनी भाजपकडून उमदेवारी मागितली होती. भाजपकडून ते प्रमुख दावेदार मानले जात होते परंतु महायुतीमध्ये हिंगोली लोकसभेची जागात शिंदे शिवसेनेला सुटल्यामुळे त्यांना संधी मिळाली नाही. परंतु नाराज न होता पक्षाची धुरा सांभाळत त्यांनी लोकसभा मतदारसंघात शिवसेनेचे बाबुराव पाटील कोहळीकर यांना साथ दिली.

केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ सर्वसामान्यांना मिळाला पाहीजे यासाठी त्यांनी स्वतंत्र वॉररूम तयार केली. त्यानंतर विधानसभा निवडणुकीच्या तयारीसाठी त्यांनी नुकतेच जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटनही केले आहे.

भाजपमध्ये माजी खा ॲड शिवाजीराव माने, माजी आ. गजाननराव घुगे तसेच माजी आ. रामराव वडकुते हे देखील हिंगोली विधानसभा लढविण्यासाठी इच्छुक आहेत. पक्षश्रेष्ठी कोणाला यावेळी संधी देणार याके सर्वांचे लक्ष लागले आहे.

हिंगोली विधानसभा मतदारसंघात काँग्रेसकडून माजी आ. भाऊराव पाटील गोरेगावकर आणि माजी नगराध्यक्ष सुधीरअप्पा सराफ यांच्या नावांची जोरदार चर्चा होत आहे. विद्यमान कळमनुरीच्या विधान परिषद सदस्या डॉ प्रज्ञा सातव यांचे सुधीरअप्पा सराफ यांचेकडे झुकते माप असल्याचे बोलले जात आहे. परंतु माजी आ. गोरेगावकर यांनी मागील विधानसभा निवडणुकीत भाजपचे विद्यमान आ. मुटकुळे यांना तगडे आव्हान दिले होते. त्यामुळे गोरेगावकर यांच्या मतांचा विचार काँग्रेस पक्षाला करावाच लागणार आहे.

वसमत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे विद्यमान आ. राजु नवघरे तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे माजी मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांच्यात लढत होणार असल्याचे दिसत आहे. गुरू-शिष्य अशी ही लढत होणार असली तरीही अद्याप पक्षाकडून अधिकृत उमेदवारी मिळाली नाही. परंतु मागील काळात तरूण आ. राजु नवघरे यांनी कमी कालावधीत कोट्यावधीचा निधी आणून वसमत विधानसभा मतदारसंघात कामे केली आहेत. त्यामध्ये सिंचनाचे काम तसेच शेतकऱ्यांसाठी त्यांनी अनेक कामे केली आहेत. वसमत विधानसभा मतदारसंघात मराठा समाजाचे प्राबल्य असून मनोज जरांगे यांचे समर्थकही मोठ्या प्रमाणात आहेत. त्यामुळे या मतदारसंघात जातीय समीकरणावरच मतदान होण्याची दाट शक्यता आहे.

कळमनुरी विधानसभा मतदारसंघात शिंदे गटाचे विद्यमान आ. संतोष बांगर यांनी प्रचाराचा धडका लावला आहे. महिला मेळावे तसेच प्रचारदौरे काढून वातावरण निर्मिती केली आहे. या मतदारसंघात त्यांच्याशिवाय इतर कोणीही अद्याप शिंदे गटातून इच्छुक उमेदवार दिसत नाही. परंतु त्यांच्यासमोर उबाठा शिवसेनेचे माजी आ. डॉ संतोष टारफे, शेतकरी नेते अजित मगर, जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील यांचे तगडे आव्हान आहे. कळमनुरी मतदारसंघात जातीय समीकरण अत्यंत किचकट आहे. आदिवासी, बंजारा, हटकर-धनगर या समाजाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे त्यामुळे या मतदारसंघात विजय मिळवणे अत्यंत कठीण असून शेवटच्या क्षणापर्यंत मतदारांचा कौल सांगणे कठीणआहे. शिवाय कम्युनिस्ट पक्षाचा एकेकाळी बालेकिल्ला असल्यामुळे आजही ग्रामीण भागात कम्युनिस्ट मतांचा प्रभाव आहे.

याशिवाय परिवर्तन विकास आघाडी, बहुजन वंचीत आघाडी यांच्या इच्छुक उमेदवारांनीही कंबर कसली असून राजकीय पक्षांकडून उमेदवारांची घोषणा झाल्यानंतर जोरदार प्रचाराला सुरूवात होणार असल्याचे दिसत आहे.

## शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांच्याविरूध्द आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची उबाठा शिवसेनेची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ आक्टोबर**

कळमनुरी मतदारसंघातील बाहेरगावी असलेल्या लोकांची यादी दोन-तीन दिवसात आमच्याकडे आली पाहीजे. फोन पे, गुगल पे करा पण बाहेरगावी असलेल्या मतदारांना बोलावून घ्या, असे वादग्रस्त वक्तव्य शिवसेना शिंदे गटाचे आ. संतोष बांगर यांनी जाहीर कार्यक्रमात कार्यकर्त्यांना केले. त्यांच्या या वक्तव्यावर उबाठा शिवसेनेने आक्षेप घेतला असून जिल्हाप्रमुख अजय सावंत उर्फ गोपू पाटील यांनी जिल्हा निवडणुक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेकडे लेखी तक्रार केली असून आ. बांगर यांचेवर आचारसंहिता भंग केल्याचा गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

कळमनुरी येथील तोष्णीवाल मंगल कार्यालयात दि १८ आक्टोबर रोजी आ. संतोष बांगर यांनी एका कार्यक्रमाचे आयोजन केले होते. महायुती सरकारने राज्याच्या विकासासाठी राबविण्यात आलेल्या महत्वपूर्ण योजनांची माहीती देण्यासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी मार्गदर्शन करतांना शिंदे शिवसेनेचे आ. संतोष बांगर यांनी कार्यकर्त्यांना संबोधीत करतांना सांगितले की, कळमनुरी मतदारसंघातील बाहेरगावी असलेल्यांची यादी दोन-तीन दिवसात आमच्याकडे आली पाहीजे. त्यांना सांगायचं गाड्या करा, तुम्हाला काय लागते ते सांगा, तुम्हाला सांगतो की, त्यांना काय लागते त्या पध्दतीने फोन पे, गुगल पे करा. त्यांना काय लागते ते पोहोचले पाहीजे आता दिवाळी जवळ आली आहे. दिवाळीमध्ये बाहेरगावी असलेले लोक आपल्या घरी येतात. दिवाळीमध्ये त्यांना सांगा बापू तुम्हाला येण्याजाण्यासाठी गाडी लागते, काय लागते ते आम्ही देऊ, तू आमच्यासाठी यायलास असे त्यांना विश्वासाने सांगा. तुम्हा सगळ्यांना विनंती आहे की, मतदारसंघातील बाहेरगावी असलेले मतदार हे मोठ्या संख्येने आले पाहीजे असे आवाहन आ. बांगर यांनी केले.

यासंदर्भात उबाठा शिवसेना आक्रमक झाली असून जिल्हाप्रमुख अजय सावंत उर्फ गोपू पाटील यांनी या वक्तव्यावर आक्षेप नोंदवीत आदर्श आचारसंहितेचा भंग झालेला आहे. त्यामुळे आ. बांगर यांच्याविरूध्द आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याबद्दल तसेच मतदारांना आकर्षित करण्यासाठी आमिष दाखविल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आली आहे.



**हिंगोली- शहरातील रिसाला बाजार भागातील पॉवर हाऊसजवळ झुडुपामध्ये अज्ञात व्यक्तीचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळला असून हे पाहण्यासाठी बघ्यांची गर्दी झाली होती. छाया- सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### राजे संभाजी महाविद्यालयात मतदान जनजागृती



हिंगोली- स्मृतीशेष अँड.ग्यानबारावजी शिरसाट सेवाभावी संस्थेचे. राजे संभाजी कनिष्ठ महाविद्यालय हिंगोली येथे विधानसभा निवडणूक होऊ घातलेल्या आहेत. याबद्दल हिंगोली जिल्ह्यातील निवडणूक अधिकारी यांच्या मार्फत राबवण्यात आलेल्या विद्यार्थ्यांमध्ये मतदान करण्याविषयी जनजागृती व्हावी, याकरिता महाविद्यालयात चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना निवडणुकीबद्दल त्याचबरोबर नाव नोंदणी कशी करावी. लोकांमध्ये मतदानासाठी जनजागृती कशी करावी, याबद्दल सविस्तर माहिती व मार्गदर्शन केले याप्रसंगी प्राचार्य शेळके यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.सौ ज्योती भट, प्रा. संदीप जाधव, प्रा.मुरलीधर डोलारे, प्रा.शिवराज तर कसे प्रा. इरफान, प्रा. ज्ञानेश्वर शिरसाट, श्री शशिकांत बोरकर, श्री ओम इंगोले सहकार्य केले.

### आचारसंहितेचा भंग केल्यास १९५०वर संपर्क साधा

हिंगोली-भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी कार्यक्रम दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम घोषित केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचार संहिता अंमलात आलेली आहे. त्या अनुषंगाने जिल्ह्यातील तीन विधानसभा मतदारसंघातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की मुक्त आणि निष्पक्ष वातावरणात निवडणुका पार पाडाव्यात यासाठी हिंगोली जिल्हा मुख्यालयात चोवीस तास कंट्रोल रूम स्थापन करण्यात आली आहे. आदर्श आचारसंहिता काळामध्ये पैसे, मद्य अथवा मौल्यवान वस्तू यांची अवैधपणे वाहतूक किंवा हालचाल होत असल्यास तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग होत असल्याचे कृत्य होत असल्याची विश्वसनीय माहिती असल्यास कोणत्याही नागरिकांनी टोल फ्री क्रमांक १९५० या नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी केले आहे.

### शहरात अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

हिंगोली- शहरातील रिसालाबाजार भागातील ३३ केव्ही उपकेंद्राजवळील झुडूपात एका अनोळखी व्यक्तीचा मृतदेह शनिवारी गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला आहे. घटनास्थळी शहर पोलिस ठाण्याचे पथक दाखल झाले असून मृतदेहाची ओळख पटविण्याचे काम सुरू आहे. यावेळी बघ्यांची गर्दी जमली होती.

## प्रसार माध्यम कक्षातील अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ आक्टोबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. या निवडणूक कार्यक्रमानुसार हिंगोली जिल्ह्यातील ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघासाठी उपविभागीय अधिकारी कार्यालय, हिंगोली येथे स्थापन करण्यात आलेल्या प्रसार माध्यम कक्षातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना आज प्रशिक्षण देण्यात आले.

यावेळी माध्यम व प्रमाणन समितीची रचना, पेड न्यूज, मुद्रीत, इलेक्ट्रॉनिक माध्यम, सोशल मिडीया यासाठी जाहिरातीचे प्रमाणन करणे तसेच त्याअनुषंगाने पाठवावयाचे अहवाल व त्यांच्या नमुन्याची माहिती, सोशल मिडिया व मुद्रीत माध्यमातील पेड न्यूज शोधणे व त्यावर कार्यवाही करणे आदी बाबींची माहिती या प्रशिक्षणामध्ये जिल्हा माध्यम व प्रमाणन सनियंत्रण समितीचे पथक प्रमुख तथा जिल्हा माहिती अधिकारी प्रभाकर बारहाते आणि जिल्हास्तरीय प्रशिक्षण समितीचे दीपक कोकरे यांनी सादरीकरणाद्वारे दिली.

यावेळी हिंगोली विधानसभा प्रसार माध्यम कक्षातील पंडित मस्के, आर. व्ही. बांगर, डी. पी. वर्मा, रवि गायकवाड, कुणाल कांबळे तसेच जिल्हा माध्यम प्रमाणन कक्षातील जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी मारोतराव पोले, सहायक माहिती अधिकारी चंद्रकांत कारभारी आदी उपस्थित होते.

## सिध्देश्वर धरणाचे दहा दरवाजे उघडले, ९७०० क्युसेस पाण्याचा विसर्ग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ आक्टोबर**



येलदरी धरणाचे चार दरवाजे उघडून पाणी सोडले जात असल्याने शनिवारी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास सिध्देश्वर धरणाचे १० दरवाजे उघडून ९७०१ क्युसेस पाणी पूर्णा नदीच्या पात्रात सोडण्यात आले आहे. त्यामुळे पूर्णा नदी दुथडी भरून वाहू लागली आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील खडकपूर्णा धरणाचे पाणी सोडल्यानंतर ते पाणी येलदरी धरणात येते. येलदरी धरणाचा एकूण पाणीसाठा ९३४ दशलक्ष घनमीटर असून धरणाचा मृतसाठा १२४ तर जीवंत पाणीसाठा ८०९ दशलक्ष घनमीटर आहे. धरणाचे जीवंत पाणीसाठ्याची टक्केवारी १०० टक्के आहे. धरण भरल्यामुळे धरणाचे गेट क्रमांक १,५,६ आणि १० हे गेट उघडण्यात आले असून त्यातून ११ हजार ४० क्युसेस पाण्याचा विसर्ग केला जात आहे.

दरम्यान, येलदरी धरणाचे सोडलेले पाणी सिध्देश्वर धरणात येत असून येलदरीच्या पाण्यावर सिध्देश्वरचे पाणी साठवण अवलंबून आहे. सिध्देश्वर धरणाचा एकूण पाणीसाठा २५२ दशलक्ष घनमीटर असून मृतसाठा १६९ दशलक्ष घनमीटर आहे तर जीवंत साठा ८० दशलक्ष घनमीटर आहे. सध्या धरणाचा पाणीसाठा १०० टक्के असून धरणात येलदरी धरणातून सोडलेले पाणी येत आहे. त्यामुळे सिध्देश्वर धरणातून पाणी सोडणे आवश्यक झाले आहे. त्यानुसार पूर्णा पाटबंधारे विभागाने शनिवारी सकाळी सात वाजता सिध्देश्वर धरणाचे १० दरवाजे उघडण्यात आले असून त्यातून ९७०१ क्युसेस पाणी पूर्णा नदीच्या पात्रात सोडण्यात आले आहे. धरणातून पाणी सोडण्यात आल्यामुळे पूर्णा नदीचे पात्र दुथडी भरून वाहत आहे. धरणात पाण्याची येणारी आवक लक्षात घेवून दरवाजे कमी जास्त उघडण्याचा निर्णय घेतला जाणार असल्याचे पूर्णा पाटबंधारे विभागाने सांगितले आहे.

## जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांकडून राष्ट्रीय कार्यक्रमाचा आढावा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ आक्टोबर**

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी जिल्हा प्रशिक्षण संघ जिल्हा सामान्य रुग्णालय हिंगोली येथे नुकतीच सर्व तालुका आरोग्य अधिकारी व वैद्यकीय अधिकारी यांच्या बैठकीत सर्व राष्ट्रीय कार्यक्रमाचा सखोल आढावा घेऊन मार्गदर्शन केले.

या बैठकीत जागतिक आरोग्य संघटनेचे सर्वेक्षण वैद्यकीय अधिकारी डॉ.सय्यद मुजीब यांनी आढावा घेत मार्गदर्शन केले. त्याचबरोबर जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. सुनील देशमुख, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पांडूरंग फोपसे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. गणेश जोगदंड यांनी आढावा घेऊन मार्गदर्शन केले

लसीकरण स्थळी घटना घडल्यास त्वरित आपल्या वरिष्ठांना कळवून सौम्य, मध्यम, तीव्र या प्रकारात वर्गीकरण करून लगेच रिपोर्टिंग करणे, नियमित लसीकरण व बीसीजी लसीकरण मोहीम प्रभावीपणे राबविणे, कुटूंब कल्याण शिबीर आयोजित करणे, एनसीडी कार्यक्रम, कीटक जन्य व जलजन्य आजार याबाबत सखोल आढावा घेण्यात आला. तसेच राष्ट्रीय आयोडीन न्यूनता विकार नियंत्रण कार्यक्रम बाबत सकाळच्या सत्रात जिल्हास्तरीय वर्कशॉप घेण्यात आले. त्याच बरोबर आदर्श आचारसंहितेचे तंतोतंत पालन करून मुख्यालयी वास्तव्य करून राहण्याच्या सूचना जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी बैठकीत दिल्या.

यावेळी निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शैलजा कुपास्वामी, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुवर्णा महाले, वैद्यकीय अधीक्षक डॉ. कल्पना सुनमकारी, डॉ. अरुणा दहिफळे, डॉ. काळे, डॉ.जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, डॉ. संदीप काळे, डॉ.अनुराधा गोरे, अमोल कुलकर्णी, मुनाफ शेख, सुनील मुनेश्वर, मनीषा वडकुते, वैद्यकीय अधिकारी तसेच जिल्हास्तरीय अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## स्ट्रॉंग रूम व आवश्यक सुविधांची कार्यवाही पूर्ण करावी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ आक्टोबर**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम जाहीर झालेला आहे. या निवडणूक कार्यक्रमानुसार हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे.

त्याअनुषंगाने निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रत्यक्ष मतदानासाठी वापरण्यात येणारी एफएलसी ओके मतदान यंत्रे प्रथमस्तरीय सरमिसळ प्रक्रियेनंतर हिंगोली जिल्ह्यातील ९२-वसमत, ९३-कळमनुरी व ९४-हिंगोली विधानसभा मतदार संघांना दि. २२ ऑक्टोबर ते २६ ऑक्टोबर, २०२४ या कालावधीत (सिग्रेगेशन) करून वाटप करण्यात येणार आहे.

यासाठी संबंधित विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याकडून पुरविण्यात येणाऱ्या वाहनावर जीपीएस यंत्र बसवल्याची खात्री करण्यात यावी. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याशी संपर्क साधून वाहनाचा नोंदणी क्रमांक, वाहन चालकाचे नाव यांची अद्ययावत माहिती ठेवून जिल्हा निवडणूक कार्यालयास कळविण्यात यावे. वाहतूक करण्यात येणारे मतदान यंत्रासोबत आवश्यक तो पोलीस बंदोबस्तासह तयार ठेवून पोलीस यंत्रणेशी संपर्कात रहावे. मतदान यंत्र स्ट्रॉंगरुमला पोहचल्यानंतर मतदान यंत्रे व्हीडीओ शुटींगसह स्ट्रॉंगरुममध्ये ठेवून सिलंबद करावे. इव्हीएम मॅन्यूअलनुसार स्ट्रॉंगरूम तयार करणे, मतदान यंत्र वाहतूक व साठवणूक करणे याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अभिनव गोयल यांनी दिले आहेत.

# निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखा : जिल्हाधिकारी अभिजीत राऊत

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ ऑक्टोबर**

नांदेड जिल्ह्यात ९ विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूकीसाठी २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. यासाठी जिल्ह्यात १५ ऑक्टोबरपासून आदर्श आचारसंहिता सुरु झाली आहे. या काळात पैशाची देवाण-घेवाण, भेट वस्तु वाटप, रोख रक्कम, अंमली पदार्थ, दारु विक्री व वाहतूक अशा घटनावर नियंत्रण होण्यासाठी संबंधित यंत्रणानी काळजी घ्यावी. यादृष्टीने जिल्ह्यात एफएसटी व एसएसटी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. या पथकांनी जास्तीत जास्त कारवाई करुन जिल्ह्यात कायदा सुव्यवस्था राखण्यावर भर द्यावा, असे निर्देश जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी अभिजीत



**● निवडणूक काळात सतर्क राहा: जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार**

**● स्वीप मार्फत मतदार जनजागृतीवर भर: मीनल करनवाल**

राऊत यांनी दिले. कायदा व सुव्यवस्था राखण्याबाबत आज जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरातील नियोजन भवन येथे आज त्यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली. यावेळी जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल, मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, निवडणूक सहाय्यक जिल्हाधिकारी मेघना कावली, अपर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, उपजिल्हाधिकारी राजकुमार माने, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, सर्व सहा. निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित विभागाचे अधिकारी आदीची उपस्थिती होती.

जिल्ह्यात विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूकीची आदर्श आचारसंहिता सुरु झाली असून या कालावधीत आचारसंहितेचा भंग होणार नाही यांची काळजी सर्व विभागानी घ्यावी. निवडणूका मुक्त, निर्भय वातावरणात व प्रलोभन मुक्त होण्यासाठी सर्व सहायक निवडणूक अधिकाऱ्यांनी काळजी घ्यावी. सर्व परिस्थितीवर एसएसटी व एफएसटी पथके बारीक लक्ष ठेवून आहेत. जिल्ह्यात वाहतूक होणाऱ्या सर्व वाहनाची इएसएमएसला नोंद होईल यादृष्टीने कारवाई व्हावी. जीएसटी. आयकर. पोलीस विभागांनी पेट्रोलिंग वाढवावे. तसेच सिझरचे प्रमाण वाढवावे अशा सूचना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांनी संबंधित यंत्रणेला दिल्या. तसेच नागरिकांनी कुठेही आचारसंहिता भंग होत असल्याचे निदर्शनास आल्यास सि-व्हीजल पवर पुराव्यासह तक्रारी करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच यापुढे सि-व्हीजल पवर तक्रारी आल्यास संबंधीत विभागाने गुन्हे दाखल करण्याची कार्यवाही करावी असेही त्यांनी स्पष्ट केले. नांदेड जिल्ह्यात १ हजार १५८ शस्त्र परवाने दिलेले आहेत. शस्त्र जमा करण्याची कारवाई प्रगती पथावर असून मागील लोकसभा निवडणूकीत ७८२ शस्त्र जमा करण्यात आली होती. नांदेड जिल्ह्यात ९ विधानसभा मतदार संघात ग्रामीण भागासाठी २ हजार २६५ व शहरी भागासाठी ८२३ असे एकूण ३ हजार ८८ मतदान केंद्र असून मतदान केंद्रावर गोंधळ होवू नये यासाठी तेथील नियुक्त पोलीस कर्मचाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी. जिल्ह्यात पाच सवेदनशिल मतदान केंद्र असून या ठिकाणी शांततेत मतदान प्रक्रीया होईल यासाठी सर्वांनी सतर्क रहावे, अशा सूचना जिल्हाधिकारी यांनी दिल्या.

विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूक दोन्हीही निवडणूका एकत्र होत आहेत. या निवडणूक कालावधीत आपल्यावर जास्त जबाबदारी असून, उपलब्ध मनुष्य बळामध्ये ही मतदान प्रक्रिया शांततेत व सुरळीत पार पाडावयाची आहे. नांदेड जिल्हा इतर राज्याच्या सीमेला लागून असल्यामुळे एकमेकात समन्वय साधत निवडणूक कालावधीत रोख रक्कम, अंमली पदार्थ, शस्त्रास्त्र, मद्य यांची वाहतूक व विक्री होणार नाही यांची काळजी घ्यावी. नियुक्त केलेल्या विशेष पथकांनी जास्तीत जास्त दक्ष राहून कारवाया कराव्यात, असे निर्देश जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी दिले.

नांदेड जिल्ह्यात ९ विधानसभा व लोकसभा पोटनिवडणूकीसाठी मतदान २० नोव्हेंबर २०२४ रोजी होत आहे. या निवडणूकीत जास्तीत जास्त मतदारांनी मतदान करावे यासाठी स्वीपमार्फत जनजागृती कार्यक्रम सुरु केले आहेत. यावेळी मतदानाचे जास्तीत जास्त उदिष्ट गाठण्यासाठी स्वीप मार्फत जनजागृती कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आल्याची माहिती जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांनी सांगितले.

## संक्षिप्त वृत्त



### रिया कदमचा प्राचार्य डॉ.कमलाकर कणसे यांच्या हस्ते सत्कार

**धर्माबाद**-येथील लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु.रिया सुनील कदम हिची नुकतीच जळगाव येथील उल्हास पाटील वैद्यकीय महाविद्यालयात एमबीबीएस या वैद्यकीय पदवीच्या शिक्षणासाठी निवड झाली आहे. तिच्या या निवडीबद्दल दि. १४ ऑक्टोंबर रोजी लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.कमलाकर श्रीपतराव कणसे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला असुन याप्रसंगी डॉ.दुर्गाप्रसाद रांदड, डॉ. बालाजी श्रीगिरे, सुनील कदम, सौ रिंकू नक्खा, प्रा.सतीश कंठाळे, प्रा.अरविंद बोधनकर, प्रा. सचिन शिंदे,डॉ.माधव हळदेकर, प्रा.सतीश पवार, प्रा.विष्णू जाधव, प्रशासकीय कर्मचारी मारुती जगदंबे शिक्षकेतर कर्मचारी सुरेश भद्रे, संजय जाधव इत्यादिची उपस्थिती होती. यावेळी रिया कदम हीस प्राचार्य डॉ.कमलाकर कणसे यांनी पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा देऊन तिचे वडील सुनील कदम यांचेही कौतुक केले.

### लोहा युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्ष पदी बाळासाहेब बुध्दे

**लोहा**-युवा ग्रामीण पत्रकार संघाच्या तालुकाध्यक्ष बाळासाहेब बुध्दे यांची निवड करण्यात आली. पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष गणेश कचकलवार यांनी नियुक्तीपत्र देऊंन जाहिर केले.या निवडीबदल मित्रपरिवारकडून शुभेच्छा देऊन सत्कार केला.

### मुतन्याळ येथील जेष्ठ महिला अमिनाबी खाजामियाँ फारूकी यांचे वृध्दापकाळाने निधन

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील मौजे मुतन्याळ येथील जेष्ठ महिला अमिनाबी खाजामियाँ फारूकी (येवतीकर) यांचे वृध्दापकाळाने दि.१८



ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४:३० वाजता निधन झाले.त्या ९५ वर्षाच्या होत्या.त्यांच्या पार्थिव देहावर शनिवारी सकाळी १० वाजता मुतन्याळ येथील दफनभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पाच मुले,दोन मुली, सूना, जावई, नातू, पणतू असा मोठा परिवार आहे. सौ.मंजुळाबाई खतगांव विद्यालयातील सहशिक्षक फारूकी जिलानी येवतीकर, जि.प.सहशिक्षक फारूकी अमजद यांच्या त्या आई होत.

### जिजाबाई गणपतराव मुंके

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील मौजे डोणगांव (बु.)येथील जेष्ठ महिला जिजाबाई गणपतराव मुंके




(८६) यांचे दि.१७ ऑक्टोबर रोजी पहाटे ३ वाजता वृध्दापकाळात अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर गुरूवारी सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात चार मुले,सूना,तीन मुली, जावई,नातवंडे,पणतू असा मोठा परिवार आहे.महाळप्पा पटने विद्यालय आदमपूर,(ता.बिलोली)येथील सहशिक्षक बालाजी मुंके यांच्या त्या मातोश्री होत.

### सिडको मनपा झोन प्रभारी सहाय्यक आयुक्त पदाचा मिर्झा बेग यांनी पदभार स्वीकारला

**नविन नांदेड**-सिडको मनपाचे सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांनी दिनांक १९ ऑक्टोंबर २०२४ रोजी सकाळी पदभार स्वीकारून तातडीची आढावा बैठक घेण्यात आली. नांदेड मनपाचे आयुक्त महेशकुमार डोईफोडे यांच्या तोंडी आदेशानुसार सिडको मनपा झोनचे प्रभारी आयुक्त म्हणून मिर्झा बेग यांची तातडीने नियुक्ती करून पुढील कामकाज पाहण्यास सांगितले असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मिर्झा बेगानी त्यांनी दिली.तसेच पदभार स्वीकारताच कार्यालयातील कर्मचाऱ्यांची तातडीची बैठक घेऊन आपल्या क्षेत्रातील वसुली आढावा व निवडणूक संदर्भातील आचारसंहिता संबंधित कार्याचा आढावा घेण्यात आला असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त मिर्झा बेग यांनी दिली.

## लावणीच्या तालावर तरुणाई थिरकली



**नवीन नांदेड**- स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि सहयोग सेवाभावी संस्था कॉलेज ऑफ एज्युकेशन विष्णुपुरी नांदेडच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ज्ञानतीर्थ २०२४ युवक महोत्सवात विविध कला गुणांच्या माध्यमातून विविध महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध कलेचे सादरीकरण केले. या युवक महोत्सवात लावणीच्या तालावर तरुणाई फिरकले यावेळीचे छायाचित्र.

## हे माते! राज्यात पुन्हा एकदा बहुमताने महायुतीचे सरकार येऊ दे!

### शालेय शिक्षण मंत्री केसरकर यांचे श्री रेणुकादेवीचरणी साकडे

**तभा वृत्तसेवा**
**माहूर,दि. १९ ऑक्टोबर**

हे माते!शेतीव्यवसायाला भरभराट येऊ दे! शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी यांसह सर्वांना सुखसमृद्धी दे! राज्याची आणखी भक्कम शैक्षणिक प्रगती होऊ दे! अशी प्रार्थना करत राज्यात होणाऱ्या विधानसभा निवडणुकीत स्थानिक किनवट/माहूर मतदारसंघातील आमदारासह महायुतीचे जास्तीत जास्त आमदार निवडून येऊ दे आणि पुन्हा एकदा राज्यात बहुमताने महायुतीचे सरकार येऊ दे! अशा मागणीचे साकडे राज्याचे शालेयशिक्षणकॅबिनेटमंत्रीदीपक वसंत केसरकर यांनी माहूरगडावरील श्री रेणुका देवीच्या चरणी केले. यावेळी मुख्य पूजारी शुभम भोपी, अमित भोपी, संभाजी भोपी यांनी धार्मिक पूजाविधी पार पाडले. शुक्रवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वा. च्या दरम्यान मंत्री केसरकर यांनी राज्यातील साडेतीन शक्तिपीठांपैकी एक असलेल्या माहूरगडावरील श्री रेणुकादेवीच्या दरबारात हजेरी लावून मातेचे दर्शन घेत पूजाअर्चा, महाआरती केली. यावेळी त्यांचे सोबत उदगीरचे माजी आमदार गोविंद केंद्रे, उपशिक्षणाधिकारी रामचंद्र पाचंगे, गट शिक्षणाधिकारी कृष्णा भराडीया यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.



देवीच्या दर्शनानंतर श्री रेणुकादेवी संस्थान कार्यालय येथे विश्वस्त चंद्रकांत भोपी यांच्या हस्ते मंत्री केसरकर यांचा यथोचित सत्कार करण्यात येऊन मातेचा प्रसाद त्यांना देण्यात आला. यावेळी विश्वस्त संजय कान्नव, विश्वस्त दुर्गादास भोपी यांची उपस्थिती होती. तदनंतर, शहरातील भारतीय जनता पार्टी कार्यालयात मंत्री केसरकर यांचा भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल वाघमारे, नगरसेवक सागर महामुने तर शिवसेना शहराध्यक्ष विनोद सूर्यवंशी यांनी शॉल, पुष्पहार व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार सन्मान केला. यावेळी महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना मंत्री केसरकर यांनी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत महायुतीतील सर्व पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी स्थानिक किनवट विधानसभा मतदारसंघ निवडणुकीत उभा राहणाऱ्या महायुतीच्या उमेदवारास बहुमताने निवडून आणण्यासाठी एकजुटीने प्रयत्न करण्याचे आवाहन केले. आधी दिवाळी व त्यानंतर राज्यात पुन्हा एकदा बहुमताने महायुतीचे सरकार स्थापन झाल्यावर महादिवाळी साजरी करु या! असा आत्मविश्वास देखील महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधताना शालेय शिक्षण कॅबिनेट मंत्री दीपक केसरकर यांनी व्यक्त केला.

## भाजपा युवा मोर्चाच्या उत्तर जिल्हा सरचिटणीसपदी बाळा पाटील यांची निवड

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव,दि. १९ ऑक्टोबर**

भारतीय जनता पार्टीच्या युवा मोर्चाच्या नांदेड उत्तर जिल्ह्याच्या सरचिटणीस पदी हदगाव शहरातील भाजपाचे जुने तथा निष्ठावंत कार्यकर्ते बाळा पाटील कदम यांची नियुक्ती युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष स्वागत आयनेनीवार यांच्याकडून करण्यात आले असून या निवडीचे वृत्त कळताच पक्षासाठी राबराब करणारे तसेच वेळे प्रसंगी आंदोलन करून आपल्या अंगावर गुन्हा दाखल करून घेणाऱ्यांचे पक्ष हा नेहमीच सकारात्मक विचार करतच असतो अशी प्रतिक्रिया भाजपाचे कार्यकर्ते बोलवुन दाखवत आहेत.



भारतीय जनता पार्टीच्या सदस्या पासून पक्षाचे काम करणारे बाळा पाटील यांची बुथ अध्यक्ष पासून ते हदगाव शहराध्यक्ष पर्यंत त्यांनी आपली राजकीय व सामाजिक कार्याचा प्रभाव टाकला. मध्यंतरी कोरोनाच्या काळात त्यांनी केलेल्या समाज उपयोगी उपक्रम त्यांनी अत्यंत चोखपणे पार पडले त्यात रक्तदान शिबिर असो की उपजिल्हा रुग्णालयातील नागरिकांच्या विविध समस्या असो त्यांचे निराकरण त्यावेळेस करण्यात आले होते. आतापर्यंत विविध आंदोलनाच्या माध्यमातून अनेक गुन्हे देखील दाखल झालेले आहेत. या निवडीसाठी वरिष्ठांकडे नांदेड उत्तर मधून बाबुराव केंद्रे, काशिनाथ शिंदे, विनायकराव जाधव, सुधाकर सोनारीकर, रामभाऊ सूर्यवंशी, हादगाव- हिमायतनगर मतदारसंघातून तुकाराम चव्हाण, आशिष सकवान, देवा धबडगे, निळू कल्याणकर ,सचिन कल्याणकर, सूर्यकांत हनवते, उमाकांत भोरे, हरिदास चिंतले, दिलीप बल्लाळ, मोरेश्वर माने, किशन कांबळे, बाळू शंकुरवार, गजानन लकडे, नंदकुमार वारकड ,किशन मिजगर, उमाकांत माळोदे, एड. रमन जायभाये, अविनाश भोयर इत्यादींनी त्यांच्या या निवडीसाठी वेळोवेळी पाठपुरावा केला होता त्यांच्या या सर्वांच्या प्रयत्नांना आता यश प्राप्त झाले आहे. या पदी निवड झाल्यानंतर बाळा पाटील यांनी माजी खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, आ.भीमराव केराम, रामदास पाटील सुमठाणकर, किशोर देशमुख, रामराव वडकुते, गजानन घुगे, संजय कौडगे, श्रावण पाटील भिलवंडे इत्यादींचे विशेष आभार मानले.

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व अजितदादा पवार यांची डॉ अमोल पा ढगे यांनी घेतली भेट





**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १९ ऑक्टोबर**

नायगाव मतदार संघाचे भाजपा युवा प्रदेश सचिव डॉ अमोल पाटील ढगे यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजीतदादा पवार यांची सदिच्छा भेट घेतली आहे. राज्यातील महायुतीचे सरकारचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजीतदादा पवार हे संभाजीनगर विमानतळावर आले असता नायगाव मतदार संघाचे भारतीय जनता पक्षाचे युवा प्रदेश सचिव डॉ. अमोल पा. ढगे यांनी विधानसभेच्या अनुशंगाने विशेष चर्चा करण्यासाठी आपल्या सहकार्या सोबत सदिच्छा भेट घेतली आहे. यावेळी प्रदेश सचिव डॉ.अमोल पा. ढगे प्रदेश महामंत्री संजयजी केनेकर, युवामोर्चा प्रदेश सचिव हर्षवर्धनजी कराड, प्रदेश सचिव युवामोर्चा कुणालजी मराठे, व भाजपा प्रदेश सहकारी उपस्थित होते.

## देगलूर विधानसभेबाबत कोणताही निर्णय नाही


### काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची आंबेडकरी चळवळीतील नेत्यांशी चर्चा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,दि. १९ ऑक्टोबर**

देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघात बौद्ध अनुयायांना डावलून काही मंडळींनी अन्य व्यक्तीला उमेदवारी देण्याचा घातलेला घाट ही एक अफवा असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसच्या वरिष्ठ पातळीवरून आता उमटत आहे. या अनुषंगाने मुंबईत नांदेड मधील काही आंबेडकरी चळवळीच्या कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतली होती या भेटीत ही चर्चा झाल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळाली आहे. सुरेश दादा गायकवाड, निवृत्ती कांबळे, शत्रुघन वाघमारे, डॉ. दिनेश निखाते आदींनी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघ हा अनुसूचित प्रवर्गासाठी राखीव आहे. या मतदारसंघात आतापर्यंत बौद्ध उमेदवाराला संधी देण्यात आली नाही. बहुसंख्येने बौध्द मतदार असलेला समाज सत्तेपासून वंचित राहिल्याने देगलूर - बिलोली विधानसभा मतदारसंघासाठी होऊ घातलेल्या निवडणुकीत आता बौद्ध समाजाचा उमेदवार द्यावा अशी मागणी या समाज बांधवांनी केली आहे. या अनुषंगाने पक्ष श्रेष्ठीकडे अनेक इच्छुकांनी मुलाखती दिल्या आहेत. दरम्यानच्या काळात भारतीय जनता पार्टीतून काँग्रेसमध्ये दाखल झालेल्या एका माजी आमदाराला उमेदवारी देण्याचा घाट घातला जात असल्याची चर्चा रंगत होती. यासाठी स्थानिक पातळीवरील एका पुढाऱ्याने आपली ताकद लावाल्याची चर्चा होती परंतु या बाबतीत माध्यमांमधून वृत प्रकाशित झाल्याची प्रदेश कार्यकारिणीपर्यंत दाखल घेतल्याची चर्चा आहे. दरम्यान याच अनुषंगाने मुंबई येथे आंबेडकरी चळवळीतील काही नेत्यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांची भेट घेतली. देगलूर विधानसभा मतदारसंघातून बौद्ध उमेदवारला संधी द्यावी अशी त्यांनी विनंती केली. त्यानुसार प्रदेशाध्यक्षांनी अद्यापही देगलूर विधानसभा मतदारसंघाचा उमेदवार निश्चित झालेला नाही. निवडून येण्यासाठी जो उमेदवार सक्षम आहे आणि जो काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ आहे अशा व्यक्तीलाच उमेदवारी दिली जाईल असा विश्वास त्यांनी पदाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती विश्वासनिय सुत्राकडून मिळाली आहे. त्यामुळे तूर्तास देगलूर दिल्ली विधानसभा मतदारसंघातून माजी आमदार अविनाश घाटे यांना उमेदवारी देण्याबाबत होत असलेल्या चर्चा केवळ वावड्या असल्याचे सांगण्यात येते.

## मुगट प्राथमिक आरोग्य केंद्रात ४२ महिलांवर कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १९ ऑक्टोबर**

नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल कर्णवाल जिल्हा आरोग्य अधिकारी डॉक्टर देशमुख मॅडम डॉक्टर सूर्यवंशी डॉक्टर शिवशक्ती पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आज प्राथमिक आरोग्य केंद्र मुगट येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात लॅप्रोस्कोपी शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते , आजच्या शिबीरात ४२ लाभार्थीवर डॉ.संतोष अंगरवार सरांनी सर्वांवर यशस्वी शस्त्रक्रिया केल्या. याप्रसंगी डॉ संजय कासराळीकर ता.आ.अ., डॉ.जिकरे , डॉ.बेंदगुडे , डॉ,अश्वीनी गवई, डॉ.अभय मोरे, श्री साळवे, श्री वडजे , श्री राठोड श्री दिंडे,श्री हुंबे,श्रीमती केसाळे, व सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. मुगट प्राथमिक आरोग्य केंद्रात सतरा कर्मचारी कार्यरत आहेत यात ३४ गावाचा समावेश आहे.

## मित्र पक्षांनी सुडाचे राजकारण करून सेनेच्या जागा बळकावल्यास वाईट परिणाम होतील : बोंढारकर

**तभा वृत्तसेवा**
**नविन नांदेड,दि. १९ ऑक्टोबर**

गेल्या पंचवीस वर्षापासून दक्षिण मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि ती जागा मित्रपक्षांनी विनाशर्त शिवसेनेलाच सोडावी अशी मागणी एका बैठकीद्वारे शिवसैनिकांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्याकडे माध्यमाद्वारे करण्यात आली या बैठकीदरम्यान दक्षिण मतदार संघातील इच्छुक उमेदवार आनंदराव पाटील बोंडारकर यांनी बैठकीदरम्यान बोलताना मित्र पक्षांनी सुडाचे राजकारण केल्यास त्यांना वाईट परिणाम भोगावे लागतील असे मत व्यक्त केले.



विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर चालू असलेल्या रणधमाळीत महायुतीतील शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंडारकर यांनी दिनांक १८ ऑक्टोंबर २०२४ रोजी एक तातडीची बैठक घेऊन दक्षिण मतदार संघातील सर्व अजी माजी शिवसेनचे कार्यकर्त्यांची बैठक घेऊन सांगण्यात आले की महायुतीतील मित्र पक्ष भाजपने दक्षिण मतदार संघ बळकावण्याची चर्चा चालू असल्याने दक्षिण मतदार संघात सर्व शिवसैनिक एकवटुन एका बैठकीद्वारे माध्यमाच्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांना मागणी करण्यात आली आहे की दक्षिण मतदार संघ हा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे आणि ती जागा शिवसेनालाच सुटली पाहीजे आणि या ठिकाणची उमेदवारी सेनेचे निष्ठावंत शिवसैनिक जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील बोंढारकर यांनाच देण्यात यावी अशा मागणीची चर्चा या बैठकी दरम्यान झाली. या ठिकाणी मित्रपक्ष भाजपाने काही कुटील कारस्थान करून ही सीट बळकवण्याचे कारस्थान केल्यास त्यांचे परिणाम वाईट होतील असे मत इच्छुक उमेदवार शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंदराव पाटील यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी या बैठकीस माजी जि प सदस्य रावसाहेब महाराज,शिवाजी कदम,उपजिल्हाप्रमुख बिल्लु यादव, सहसंपर्कप्रमुख गुरमितसिंघ टमना,शहरप्रमुख तुलजेश यादव,विधानसभाप्रमुख अशोक उमरेकर,शहरप्रमुख सुहास खराने, उपशहरप्रमुख पप्पु गायकवाड,तालुकाप्रमुख अशोक मोरे, महिला जिल्हाप्रमुख गिता पुरोहीत , तालुकाप्रमुख स्नेहा पाटील, शहरप्रमुख लक्ष्मीबाई दुधे,युवासेना जिल्हाप्रमुख आमोदसिंघ साबळे,आवतारसिंग महाराज,शेख शिराजभाई यांच्यासह शेकडो शिवसैनिकांची उपस्थिती होती.

## प्रेम,दया, करुणा शांती शिलता आचरण शिकवणारा जगातील एकच धर्म आहे तो म्हणजे बुद्ध धम्म: भन्ते अतुल्य रतन महाथेरो

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १९ ऑक्टोबर**

शहरातील बौद्ध प्रशिक्षण केंद्र येथे दि. १८ ऑक्टोंबर रोजी वर्षावास समाप्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम तथागत भगवान गौतम बुद्ध डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन सिताराम चौदंते, डि. जी. चौदंते, सुभाष चौदंते, यांनी केले आणि वर्षावास समाप्ती कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून भन्ते अतुल्य रतन महाथेरो माजी खासदार श्रीलंका हे होते. मागील तीन महिन्यापासून बुद्ध ग्रंथाचे वाचन उपासिका वैशाली किशोर शेवाळे यांनी केले होते. वर्षावास समाप्ती कार्यक्रमा निमित्त श्रीलंकेचे माजी खासदार अतुल्य रतन महाथेरो यांनी धम्मदेसना व प्रवचनातून उपासक-उपासिकांना



सांगितले आहे की धर्म, जाती व पैशाने कोणी श्रेष्ठ होत नाही तर माणुस हा कर्माने श्रेष्ठ होतो आणापान सती केल्याने मणाची एकाग्रता होते व मण एकाग्रता झाल्याने माणव जिवन प्रगती करू शकतो सुखी होऊ शकतो.

जिवन जगन्याची सुंदर कला म्हणजे बौध्द धम्म, जगामध्ये आई ऐवडे प्रेम कोनीही करत नाही, उदाहरणात म्हणजे हजारो माणसाची हत्या करनारा अंगुलीमालला ही त्याच्या आईने कधीही दुर केले नाही. प्रेम वात्सल्य दया करुणा शांती शीलता आचरण शिकवणारा जगातील एकच धर्म आहे तो म्हणजे बुद्ध धम्म, या वर्षावास समाप्ती कार्यक्रमाप्रसंगी डॉ खेमधम्मो महाथेरो, मुळावा भंते पय्यारत्न थेरो मुळावा, भंते शिलरत्न थेरो नांदेड , भंते सुभुती थेरो लहानलोण, भंते संघप्रिय नांदेड, भंते गगनबोधी, व श्रामणेर संघ, शहरातील भीमनगर, नवी आबादी, अशोकनगर लूंबिनी नगर, समता नगर सिद्धार्थ नगर, येथील बौध्द उपासाक उपासिका बालक बालिका युवकांची मोठया संख्येने उपस्थिती होती.